
# श्रीसाईलीला



ार्च १९६३

किं ५० न. पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर वाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ६९६३१



# श्री साई वाक्सुधा

तुम्हीं कोणीही असा व तुमचें रहाणे सवरणें कुठेंही असूं द्या. तुम्हीं कोण व कुठे रहाणारे हे मी पहात नाहीं. भक्तिभावानें तुम्हीं माझी आठवण करून माझ्यापुढें हात पसरले तर मी तुमची इच्छा पूर्ण केल्याशिवाय रहाणार नाहीं. तुमच्या अंत.करणांत निर्मळ भाव मात्र पाहिजे. मग रात्र-दिवस मी तुमच्या सन्निध आहे असें समजा. मी देहानें शिरडींत असलों व तुम्हीं सात समुद्रापलीकडे दूरवर कुठेही असलां व काय वाटेल तें केलें तरी तें मला समजल्याशिवाय रहात नाहीं. माझी नजर चौफेर व चोहींकडे असते. त्यामुळें मला कुठेही कांहीं घडके तर तें तावडतोब समजतें. तुम्हीं या पृथ्वीच्या पाठीवर कुठेही जा. मी तुमच्याबरोबर सतत आहे म्हणून समजा. कारण माझें घर तुमच्या अंतःकरणांतच आहे. असा तुमच्या अंतःकरणांत ठाण मांडून जो मी बसलों आहे त्या माझें सतत चिंतन करा. तुमच्याच काय परंतु सर्व भूतमात्रांच्या ठाया माझेंच वास्तव्य आहे.

— श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४१ वें ] मार्च १९६३ [ अंक १२ वा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्पे

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

प्रत्येकाची धडपड सुखासाठीं सदैव चाललेली असते; परंतु त्याच्या वाट्यास सुख सदासर्वकाळ येत नाहीं. कधी सुख तर कधीं दुःख ! गरीब असो वा श्रीमंत असो; राव असो वा रंक असो. या सुखदुःखाच्या फेऱ्यातून आजवर कोणीही सुटलेला नाहीं. आपल्या सभोंवार हें नेहमीं पहात असतांही आपण सुखासाठी आटापेटी करीतच असतों. तो मानवी स्वभाव आहे; परंतु सुख किंवा दुःख हें पूर्व संचितानुरूप आपल्या वाट्यास येत असतें. सुख वाट्यास आले तर आनंदानें हुरळून जावयाचें नाहीं व दुःख चाल करून आलें तर दुःखी कष्टी न होता भगवंतावर भरिभार टाकून तें त्याचे स्मरण करून भोगावयाचें हें कांहीं आपल्याकडून घडत नाहीं. कसें घडेल? जाणत्यानीं व ज्यांनीं या जीवनाचें मर्म ओळखलें आहे त्यानीं हें आपणास वारंवार सांगितलें असताहि त्याचाच विसर आपणांला नेमका पडत असतो. इष्ट अनिष्ट, सुख आणि दुःख हें पूर्वसंचितानुसार वाट्यास येत असतें. कधी अमृत तर कधीं वीषहि प्राशन करावें लागतें. आपण मनुष्य जन्म मिळविला आहे ना? त्याचें हेंच तर वैशिष्ठ्य आहे. जें जें वाट्यास येईल तें तें समाधानपूर्वक ईशश्रद्धापूर्वक निमूटपणें भोगावयाचें जें जें येईल तें तें साहें। अल्ला मालिक वाली आहे। सदा तयाच्या चिंतनीं राहे। काळजी वाहे तो सारी ॥ असें रोखठोक शब्दांत बाबांनी आश्वासन देऊन ठेविलें आहे. तें त्रिवार सत्य आहे. आपले सारें लक्ष त्याच्या चरणाकडे लागलेलें असावें. सुख देणारा तोच व दुःखही देणारा तोच. दोन्ही देणग्या त्याच्याच. त्याची इच्छा आम्ही सुखांत लोळावें अशी त्याचप्रमाणें त्याची इच्छा आम्हीं दुःखात होरपळावें अशी ! ही भावना कांही केल्या आपल्या अंतःकरणांत जागी होत नाहीं.

साईबाबा हें महत्वाचें व जीवन सुसह्य करणारें तत्वज्ञान आपल्या भक्ताच्या गळीं उतरावें यासाठीं सतत प्रयत्न करीत असत. त्यांचे ते दीर्घ प्रयत्न आजही आपल्यासमोर आहेत. त्याकाळीं काय किंवा आजच्या अथवा कोणत्याहि काळीं त्या तत्वज्ञानाची कास धरली असता मनुष्य या सुखदुःख मिश्रित संसार सागरातून तरून जातो.

एका प्रत्यक्ष आपल्यासमोर घडलेल्या घटनेच्या रूपानें याच तारक तत्वज्ञानाची बाबानीं आपल्या भक्ताना शिकवण दिली. डॉ. पिल्ले या नांवाच्या बाबांच्या एका भक्तास नारूची व्यथा झालेली होती. ते व्यथेनें अतिशय पिडले. जीवनास कंटाळले ! एक दोन नव्हे शरीराच्या सात

भागांना नारूनें पोखरले होते. ते शिरडीला मोठ्या आशेने आले व बाबांची सेवा करूं लागले. साईबाबांचेंहि त्यांच्यावर भारी प्रेम होते. डॉ. पिल्ले यांना सारे लोक व बाबाहि भाऊ म्हणत असत. बाबांना ते आपल्या सन्निध असावेत असें वाटत असे इतकें होतें बाबांचें त्यांच्यावर प्रेम. परंतु त्यांच्या पूर्वसंचिताला कोण काय करणार ? ते बाबांची करुणा पदोपदी भाकीत असत. त्यांच्यानें दुःख सहन करवत नव्हतें दुःखाचा कडेलोट झालेला होता. बाबा त्यांची समजावणी करीत असत; परंतु ज्याला असह्य वेदना भोगाव्या लागताल त्याला तत्वज्ञान सांगून त्याचा काय बरे उपयोग ? त्यांचा भोग संपण्याची बाबा वाट पहात होते. डॉ. पिल्ले म्हणत असत कीं, "मी कधी कोणाचें वाईट केलें नाही. वाईट चिंतिलें नाहीं. सदासर्वकाळ सदाचरणानें वागत आलों. असें असता माझ्या मागें काय ही पीडा ? दुःखाच्या असह्य वेदना भोगीत पडण्यापेक्षा मला मरण का नाहीं येत ? मग सुटेन तरी एकदाचा या यातनांतून ! दुःख भोगल्याशिवाय त्यांतून सुटका नाही. आपल्या वाट्याचें दुःख आपलें आपण भोगावयाचें. त्यात वाटेकरी कोणाला करता येत नाहीं व दुःखाचा वाटा उचलायला कोणी पुढेंही येत नाही, हे तत्त्वज्ञान मीही जाणतो; परंतु या यातना माझ्यानें सोसवत नाहींत त्याला काय करूं ?" असें डॉ. पिल्ले याचे रुदन सतत चालू होतें. ते असेंही म्हणाले कीं, "मला जन्मोजन्मी दुःखच भोगायचें असेल तर मी एक सोडून दहा जन्म घेईन, परंतु बाबा ! आता या दुःखांतून मला सोडवा एकदाचे ! 'पुरे आता या जन्माचें जिणे । सोडवा मज जीवेंप्राणें । नको आतां हें कष्ट सोसणें । हेंच मागणें मागतो । '

त्यांच्या हा आक्रोश व अगतीकता बाबांच्या कानापर्यंत जाऊन पोहोंचली. डॉक्टर पिल्ले यांचा दुःखभोग संपण्याची वेळ अगदीं नजीक येऊन ठेपली होती.

पूर्वी ते बाबांच्या मशिदींत येऊन कण्हतकुंथत बसत असत; परंतु अतो दुःखावेगामुळें अलिकडे तें येणेंजाणें बंद पडलें होतें. बाबांनीं आपल्या एका भक्ता करवी त्यांना निरोप पाठविला की, आता जगण्या–मरण्याची वा दुःखाची चिंता करूं नकोस. आणखी दहा जन्म घ्यावे लागले तरी घेईन; परंतु या चालू दुःखातून सुटका करा अशी आळवणी त्यानी चालविली आहे. त्यांना म्हणावे, आता तू निर्भय हो, कळीकाळाचेंही भय बाळगू नकोस, दहा जन्माची गोष्ट कशाला ? आता आणखी दहाच दिवसांत दुःखातून तुझी सुटका होईल ! मी तुझ्या पाठीशी असता मरण का मागतोस ? तुला मोक्ष हवा असला तर तो द्यायलाही मी समर्थ आहे. मी तुझ्यासाठीं वाटेल तें करायला समर्थ असता तू मरणाची मागणी का करतोस ! हाच का तुझा पुरुषार्थ ?

एवढें बोलून व धीर देऊन बाबानीं सांगितलें कीं, त्याला उचलून माझ्याजवळ घेऊन या. अजून त्याला थोडें परंतु जाज्वल्य दुःख भोगावयाचें राहिलें आहे. तें माझ्या

दृष्टींसमोरच भोगूं द्या त्याला! गांगरून किंवा घाबरून जाण्यांत कोणता फायदा! जा आणा त्याला माझ्याजवळ.

त्यानंतर डॉ. पिल्ले यांस उचलून बाबांजवळ आणून ठेवण्यांत आलें. त्यांचें विव्हळणें चालूच होतें. बाबांनीं त्यांना तक्क्या टेकण्यासाठीं देऊन आपल्याजवळ बसवून ठेविलें. बाबा त्यांना आंजारूं गोंजारूं लागले. पाय लांब करवत नव्हते. कारण पाय नारूमुळें सुजला होता; परंतु बाबांनीं त्यांचे पाय ताणून त्यांना आडवा पडून रहायला सांगितलें. ओरडणें कोकलणें चालूच होतें. नानासाहेब चांदोरकरांनीं पिल्ले यांच्या पायावर पट्टी बांधून ठेविली होती. तीहि बाबांनीं सोडून टाकायला लाविली. कांहीं नको. पाय ताणून पडायचें!

बाबा त्यांना दोन समजुतीच्या गोष्टी सांगताहेत. सायंकाळ होऊन गेलेली होती. जिकडे तिकडे बत्त्या पेटूं लागल्या होत्या. बाबांच्या निवासस्थानीं अबदुल्ला येऊन सर्वत्र पणत्या लावीत असे. बाबांना पणत्यांची भारी आवड. अबदुल्ला काळोख घालविण्यासाठीं झपझप पणत्या पेटवीत होता. आपल्या कामांत तो नेहमीप्रमाणें दंग होता. त्या कामापुढें-काळोख घालविण्याच्या कामापुढें, त्याला दुसरें तिसरें कांहीं दिसत नसे. ती मशीद बेताचीच म्हणजे तेथें पुष्कळ लोकांना एकाच वेळीं बसतां येत नसे. जागा बेताची. त्यांत डॉ. पिल्ले यांच्या आरडाओरडीमुळें त्यावेळीं विशेष गर्दी जमलेली होती. त्या गर्दीतून वाट काढीत सभोंवार फिरणें आणि पणत्या लावणें अबदुल्लास भारी जड जात होतें. तरी सांगायचें कोणाला? आपलें काम पार पाडण्यासाठीं झटायाचें एवढें त्याला माहीत होतें. त्याचें सारें लक्ष पणत्या पेटविण्याकडे होतें.

डॉ. पिल्ले यांचा पाय लांब पसरलेला होता. त्या सुजऱ्या व दुखीच्या पायावर त्या घाईत न दिसून अबदुल्लाचा पाय जोरानें पडला!

अरेरे! काय झालें हें! पिल्ले केवढ्या मोठ्यानें किंकाळले! किंकाळतील नाहींतर काय करतील? कळ कपाळांत गेली. आजवर झाला नव्हता एवढा तो त्या कळीचा जबरदस्त जोर होता. मग ते किंकाळणार नाहींत तर दुसरें काय बरें करणार?

नारूमुळें सुजलेला तो पाय! त्याला सहज हात लावण्याचीहि भीति वाटायची! त्या सुजऱ्या पायावर अबदुल्लासारख्याचा भरभक्कम पाय एकाएकीं पडला. केवढा घाला पडला हा! परंतु दुःखामागून सुख हें यावयाचेंच. त्या पायांतील नारू त्यामुळें फुटून पाय वाहूं लागला! आणि तेंच घडणें जरूर होतें.

एका बाजूला पाय वाहून हलकें वाटत होतें आणि डॉ. पिल्ले हे बाबांचें भजन गात होते. त्यांना आतां आराम वाटूं लागला होता.

ही सारी बाबांची लीला हें सर्वजण उमजले. आतां पिल्ले यांचा दुःखपरिहार होऊं लागला होता. आता त्याच्या वाट्याला आस्ते आस्ते आराम यावयाचा होता.

बाबानीं डॉ.पिल्ले यांस कांही न बोलता त्यांच्या निघासस्थानीं पोहोंचविण्याची तेथील लोकाना आज्ञा केली.

जखम झाली होती. तिच्यावर लेप करणें जरूर होतें. बाबांच्या आज्ञेप्रमाणें त्या जखमेवर उदीचा लेप करण्यात येऊन पोटांत घ्यायलाही उदी देण्वात आली. औषध आणि अनुपान सारें तेंच दुसरें काहीं करण्याची जरूरी राहिली नाही.

डॉ. पिल्ले यांच्या शरीरातून सात जिवत नारूचें जंतू आस्ते आस्ते बाहेर पडले. व त्याची थोड्याच कालावधीत त्या दुर्घर दुःखातून एकदाची सुटका झाली.

डॉ. पिल्ले यांच्या या प्रत्यक्ष घडलेल्या उदाहरणावरून तुम्हीं आम्ही कितीतरी गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. सुख काय किंवा दुःख काय, जें काहीं वाट्याला येईल तें देवावर भरिभार टाकून धैर्यानें सोसावयाचें, घाबरून किंवा गांगरून जावयाचे नाही आपली भगवतावर श्रद्धा दृढ असली पाहिजे. दुःखावेग वाट्याला आला तर तो काहीं चुटकीसरसा नाहींसा होत नाहीं. तो भोगणेंच प्राप्त. ओरड करून, हातपाय आदळून काहीं होत नाहीं. मनाला मात्र त्यामुळें नसता ताप बाबांचें सदैव स्मरण हेंच दुःखाचें विस्मरण होण्याचें साधन आहे. तें आम्हीं घट्ट पकडून धरू या. म्हणजे दुःखातही समाधान कसें मानून रहावें हें आम्हांला समजेल.

—संपादक

---


॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, विणकाम**

यांस लागणारे सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोकर, गंगावने आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**❋ आमची कोठेंही शाखा नाहीं. ❋**




**संकट दूर करणारे बाबा—**

श्रीमती सोनाबाई राजोपाध्ये, ४ श्री निवासन् स्ट्रीट, मद्रास २८ ह्या आपणास आलेले श्रीसाईबाबासंबंधीं अनुभव निवेदन करतांना लिहितात कीं, १९५० पर्यंत मला साईबाबासंबंधीं कांहींच माहित नव्हतें. मी त्याची भक्त बनलें याला कारण माझी एक मैत्रीण. तिच्याशीं एकदा सहज बोलत असतां मी म्हणालें कीं, माझें मन नेहमीं संशयी व भीतिग्रस्त असतें. काय करावें समजत नाही. त्यावर तिनें आपल्या जवळची श्री साई सच्चरिताची पोथी दिली व म्हणाली मन लावून " ही पोथी वाच म्हणजे तुझ्या मनाला शांतता मिळेल. " मला त्यावेळीं तिच्या सांगण्याचें फारसें महत्व वाटलें नाहीं. २।३ वेळा ती पोथी वाचण्याचा प्रयत्न केला; परंतु चंचल मन त्या पोथीकडे वळेना. पोथी तशीच ठेऊन दिली. आमच्या घरी बाबाची एक तसबीरही होती. तिच्याकडेही माझें लक्ष नव्हतें.

माझा मुलगा बाहेरगावीं होता. त्याच्या मनातून शहरात एखादें घर घ्यावें असें होतें. त्यानें त्याप्रमाणें आम्हाला लिहिले. त्यासाठी त्याचे वडील शहरांत जाऊन एका नातेवाईकाकडे राहिले. घराच्या शोधात होते. चार महिने झाले तरी मनासारखें घर काही मिळेना. मी माझी मुलगी आणि माझ्या बन्स घरात होतो. पुरुष मंडळी कोणी नव्हती. फार त्रास वाटूं लागला. लौकर घर मिळू दे. म्हणून देवाची प्रार्थना करीत होतें. त्यावेळी माझें लक्ष साई सच्चरिताकडे वळलें. थोडे थोडें वाचू लागलें. अर्थ ध्यानी येऊं लागला. मन रमू लागलें. एक रात्री मला स्वप्न पडलें. स्वप्नात मी एका नातेवाईकाच्या घरी गेलें असून तेथें चित्रांतल्याप्रमाणे बाबा एका आसनावर बसले आहेत. त्यांच्याकडे मी पाहिलें नाही तरी त्यानी मला खुणेनें जवळ बोलावले. मी जवळ गेलें व त्यांना नमस्कार केला. तेव्हा ते म्हणाले, तू शिव वाच. ( शियन् पडी ) मला समजावें म्हणून ते शब्द त्यानीं तामिळ भाषेंत उच्चारले. मला त्यावेळीं त्या शब्दाचा अर्थ समजला नाहीं व ती घटना नंतर मी विसरून गेलें.

**मैत्रिणीचा सल्ला**

नंतर सुमारें एक महिन्यानें माझी एक कीर्तनकार मैत्रिण आमच्या गावीं आली असता तिने माझ्या पतीची व चिरंजिवाची चौकशी केली. मी

तिला घरासंबंधी माझी काळजी लागून त्यासाठीं ते दोघेहि परगावीं असल्याचें सांगितलें, तेव्हां ती म्हणाली, शिवलीलामृतातील रुद्राध्यायाचे तुम्हीं पारायण करा. ( अकरावा अध्याय ) मला त्याबाबतींत चांगले अनुभव आले आहेत. माझी मुलें आजारी पडल्यास मी अकराव्या अध्यायाचें पारायण करते व त्या पुस्तकावर भस्म घालून तें मुलाना देतें व मग मी चिंतामुक्त होतें.

ते ऐकतांच माझ्या डोक्यांत चक्क प्रकाश पडला. बाबानी ' शिव वाच ' म्हणून स्वप्नांत सांगितले तें ' शिव ' हेंच असावें.

मग दुसऱ्या दिवसापासून मी शिवलीलामृताच्या अकराव्या अध्यायाचें त्रिकाळ पारायण सुरू केलें. असा अकरा दिवस हा उपक्रम चालू होता. अकराव्या दिवशीं सायंकाळीं मला पत्र आलें. त्यांत त्यानीं उत्तमपैकी घर मिळून सौदा झाला. आतां आमच्या नावें लौकरच घर होईल. मी उद्या येत आहे. तें पत्र वाचून माझी चिंता दूर झाली व मन आनंदानें भरून गेलें. बाबानीं माझें लक्ष आपल्याकडे खेचून घेतलें. बाबांची तसबीर देवघरांत टांगून मी त्यांची रोज भक्तिभावानें पूजाअर्चा करू लागलें. त्यानंतर प्रेमभावानें मी श्रीसाईसच्चरितांचें नित्य नेमानें पारायण करू लागलें.

**आंब्यांचा नवस**

माझ्या मुलास मनाप्रमाणें घर मिळालें. त्याचें लग्नकार्य उरकलें व त्याचा संसार थाटून दिला. मला फार आवडणारें फळ म्हणजे आंबा. शिरडीस जाऊन बाबाना आंबे अर्पण करून मग खायचे असा मी संकल्प केला होता. मुलाचा संसार थाटून झाला तरी माझें शिरडीस बाबाच्या दर्शनास जाणें काही होईना. आतां काय करणार? मग आमच्या मद्रासमध्यें साईबाबांचें मंदिर आहे. त्या मंदिरात जाऊन बाबास आंबे अर्पण करावे म्हणजे मग आंबा खायला हरकत नाहीं अशी मनाची समजूत. त्याप्रमाणें बाजारात जाऊन चांगल्यापैकीं रसरशीत असे मोठे पंचवीस आंबे खरेदी केले व ते साईमंदिरांत घेऊन गेलों. त्यावेळीं पूज्य नृसिंहस्वामी हयात होते.

**मोसंबी कुठून आले ?**

ते पंचवीस आंबे एका तबकात घालून पुजाऱ्यास नैवेद्य दाखविण्यास सांगितलें तसेंच पांच आंबे मागें ठेऊन बाकीचे तेथील भक्तास वाटण्याची विनंती केली. त्याप्रमाणें पुजाऱ्यानें पाच आंबे तबकात मागें ठेऊन तें तबक मला आणून दिलें. पहातो तर काय? त्या तबकात आंबे चार व एक मोसंबी होतें. पुजाऱ्यास विचारतां तो म्हणाला, माझ्याजवळ मोसंबी कुठचें? मी पांच आंबे तबकात ठेविले होतें. मला संशय आला. त्यावरून मी समजलें कीं, प्रत्यक्ष शिरडीस जाऊन आंबे अर्पण करीपर्यंत मी आंबा खावा अशी बाबांची इच्छा दिसत नाहीं. म्हणून बाबांनीं आंब्याऐवजीं मला प्रसादादाखल मोसंबी दिलें.

तबकातील चार आंबे तेथेंच वाटून टाकले व मोसंबी घेऊन मी घरी आलें. ही १९५२ मधील घटना. योगायोग असा कीं १९६० पर्यंत मी मनांत असूनही शिरडीस जाऊं शकलें नाही व तेथपर्यंत आंब्यास शिवलें नाहीं.

१९६० सालीं शिरडीस जाण्याचा योग आला तो तरी कसा ? त्या वर्षी मी माझी मुलगी व वन्स असे तिघे शिरडीस जाण्यास निघालो. माझ्या बहिणीचा मुलगा रेल्वेंत अधिकारी होता. आदल्या दिवशीं त्याला जागा रिझर्व्ह करण्यास सांगितलें तेव्हां तो हसला व म्हणाला, रिझर्व्हेशन आठ दिवस अगोदर करून ठेवावें लागतें. आतां एकाएकीं तें कसें बरें होणार ? मी बाबांची मनोभावें प्रार्थना करीत होतें कीं, यावेळीं तरी शिरडीस येण्याचा योग जुळून येऊं द्या. कांहीं वेळानें माझ्या बहिणीचा फोन आला कीं, एकाएकीं पाच जागा मोकळ्या झाल्या आहेत. किती हव्या सांग. मी जागा रिझर्व्ह करीत आहें, पैसे घेऊन ये.

## हा योगायोग म्हणायचा

खरें सांगायचें म्हणजे आम्हांला पांच जागांचीच जरूरी होती. त्याप्रमाणे सर्व व्यवस्था होऊन आम्ही शिरडीच्या प्रवासासाठीं निघालों. वाटेंत गाणगापुरास नवस फेडावयाचा होता तो फेडून आम्ही शिरडीस गेलों. त्या भागात आम्हीं नवीन होतो. तेथें जाताच रिसिव्हर साहेबानी आमचे चागलें स्वागत केलें व आम्हाला सोईवार अशी जागा देवविली. आमच्या तैनातीस दोन माणसें ( नवरा व त्याची बायको ) दिलीं. त्याच्या मदतीनें बाजारहाट पाहून आलो. मी आंब्याच्या शोधात होतें. मला नवस फेडायचा होता. बाबूरावास (आमच्या तैनातीस दिलेले गृहस्थ) विचारतां तो म्हणाला, ' सध्या पिकलेले आंबे कुठून मिळणार ? अजून यायला लागले नाहींत ! '

आता काय करणार ? आंबा बाबाना अर्पण केल्याशिवाय खायचा नाही हा माझा संकल्प यावेळीं पुरा करता आला नाहीं तर तो पुरा होण्यास आणखी किती वर्षे लोटणार कोण जाणे अशा विचारात मी होतें. सहा वर्षांचा काळ असातसा गेलेला होता. बाबूराव भेटेल त्याला आंबे आणायला सांगत होता. १।२ दिवस गेले असतील. इतक्यात कोणी एक मुसलमान व्यापारी पन्नास पिवळ्या आंब्यानीं भरलेली एक टोपली घेऊन बाबूरावाच्या सांगण्यावरून माझ्याकडे आला. एकाएकी व हासभास नसता उत्तम आम्रफळें घेऊन आलेल्या त्या आंबेवाल्यास पाहून मला गगनांत मावेनासा आनंद झाला !

मी त्याच्या हाती दहा रुपयांची नोट दिली. तेव्हां सात रुपये घेऊन तो तीन रुपये मला परत देऊं लागला. मी ते परत न घेतां ते तुलाच ठेव असें म्हणालें. परंतु ते रुपये न घेता माझ्या पुढ्यांत ठेऊन निघून गेला. तो मुसलमान परत कांहीं दिसल नाहीं.

नंतर त्या पन्नास आंब्याचा बाबाना नैवेद्य दाखवून व दोन आंबे प्रसादादाखल घेऊन बाकीचे सारे तेथें वाटून टाकिले. तीन रुपये बाबाच्या पेटींत टाकिले. त्या दिवसापासून मी आंबा खाऊ लागलें.

**पंढरपूरची यात्रा**

तेथून आम्हांला पंढरपूरला जायचें होते. तोही आम्हाला नवीन मुलख परंतु बाबा पाठिराखे असल्यावर चिंता कसली ? आम्हीं पंढरपुरात पोहोंचलों तो दिवस एकादशीचा होता. गर्दी फार होती. आम्हीं सचिंत एका जागीं बसलों होतों. कुठें जावें, कुठें उतरावें या विचारात होतों तेथें आमच्या जवळ एक पोलिस अधिकारी व त्याची भावजय अशी दोघे बसली होती. तो अधिकारी म्हणाला, "बाई ! तुम्हीं या भागांत अगदी नवख्या दिसतां. संभाळून रहा. येथें पंडे लोक फार सतावलात."

तें ऐकून माझी काळजी वाढली, तें पाहून तो अधिकारी म्हणाला, मला येथील माहिती आहे. पूर्वी या भागात मी दोन वर्षे होतों. आता नाही. देवदर्शनास आलो आहे. मी सांगतो तसें करा. येथें अमूक ठिकाणीं केशव काका बडवे म्हणून रहातात. ते सज्जन गृहस्थ आहेत. तुम्हीं त्यांच्याकडे अगदी निर्धास्तपणें रहा. माझें नांव सांगा. तुमची सर्व व्यवस्था उत्तम प्रकारें होईल.

त्याप्रमाणें आम्हीं काका बडवे याच्या घरी गेलो. आणि त्या पोलीस अधिकाऱ्यानें सांगितल्याप्रमाणें अगदीं तंतोतंत अनुभव आला. ही बाबांचीच कृपा नव्हे तर काय ?

× × ×

**बाबांची कृपा**

श्री. गो. खि. कोठावळे, वरळी बी. डी. चाळ न. ४१ मुंबई नं. १८ हे लिहितात की,

तो दिवस मनामध्यें आला की मन आनदानें अतिशय भरून येतें. होताच तसा तो सुवर्णदिन. तो दिवस म्हणजे मंगळवार ता. २६ आक्टोबर १९५४. हा दिवस माझ्या आयुष्यातील भाग्याचा मी मानतों. त्या दिवशीं माझे घरीं लक्ष्मीपूजन होतें. पूजा वगैरे आटोपून माझा नित्याचा कार्यक्रम मी व्यवस्थित पार पाडला. शेवटी मी त्या पूजनाचे जवळच गाढ निद्रेंत झोपी गेलों. त्या रात्रौ जवळ जवळ ४ वाजतां मला स्वप्न पडलें. स्वप्नांत बाबा येऊन फकिरी वेशांत त्याची मूर्ती माझ्यापुढें दत्त म्हणून उभी राहिली व गाढ झोपेंतून मला जागे करून तूं झोपी काय गेलास ? ऊठ लवकर त्या दत्ताचे दर्शन घे ? अशा वेळी मी स्वप्नांतच दत्ताचें दर्शन घेतलें. त्यावेळीं बाबानी सांगितलें की तूं माझ्या भेटीला जाशील त्यावेळीं एक झाड आहे त्या खालील जागा

मी तुला ही झाडू देत आहे तिनें ती स्वच्छ कर. त्या झाडाची स्वच्छता राखणें हेंच तुझें कर्तव्य आहे असें सांगून बाबा अदृश्य झाले.

त्यावेळेपासून मी बाबांचा ध्यास करूं लागलों व नित्य एकनिष्ठेनें त्यांचे स्मरण करूं लागलों. त्यांचेपूर्वी बाबा कोण व त्यांचे जीवित कार्य काय याबद्दल कांहींच माहिती नव्हती. परंतु स्वप्नाचा उलगडा व्हावा असा ध्यास लागल्यामुळें मी त्यांच्या पूर्ण चौकशीस लागलों. नंतर बाबांच्या भेटीची फार इच्छा झाली म्हणून मी गुरुपौर्णिमेस म्हणजे १८ मे १९५५ रोजीं आगगाडीनें रात्रौ ११॥ वाजतां गाडींत बसण्याचें केलें. आपल्या परिवारांचा निरोप घेऊन निघालों ती वेळ रात्रीची होती. बोरीबंदर स्टेशनवर गाडींत बसलो, गाडीची शिटी झाली. गाडीनें स्टेशन सोडलें. गाडी झाप झाप करीत चालत होती. वारा वाहत होता. सर्व पशु, पक्षी निद्रेत होती. अशा शांत समई मला ही गाडींत झोप आली. त्यावेळीं झोपेत बाबा येऊन तूं माझे भेटीला येत आहेस परंतु तुला माझे जवळ देण्यास कांहीं नाही. माझे जवळ एक झाड आहे. तें एक बाजूला कडू व एका बाजूस गोड आहे त्याची चार पानें तूं येशील त्यावेळीं घेऊन जा. असे सांगून बाबा अदृश्य झाले. पुढें गाडी मनमाड स्टेशनवर आली त्यावेळीं मी जागा झालों व स्टेशनवर उतरलों तोंड वगैरे धुऊन चहा पाणी घेऊन मी एस्. टीत बसलों व शिर्डीला दोन तासांत पोहचलों तेथें गेल्यावर माझें मन प्रसन्न होऊन मी बाबांचें दर्शन घेतलें व रात्रौ तेथें झोपी गेलों बाबांच्या दर्शनानें प्रवासांत झालेला थकवा लुप्त झाला. रात्रौ बाबा पुन्हां येऊन म्हणालें, तुला झाडाची आठवण आहे नां ? मग झाडाची स्वच्छता ठेव हो !

ता. २० रोजीं सकाळीं स्नान आटोपून मी फुलांची माळ घेण्यास गेलों त्यावेळीं त्या फुल विक्याला विचारलें इथें एका बाजूला गोड व एका बाजूला कडू असे एकादें कोणते झाड आहे काय ? मी त्याला ही गोष्ट भितभीतच विचारली. भिण्याचे कारण एकच कीं, तो मला मूर्ख म्हणेल; कारण एका झाडामध्यें असें दोन प्रकार कुठें असतात काय ! अशाल्न्हेच्या शंका माझ्या मनांत थैमान घालीत होत्या; परंतु धीर करून तो कांहीं म्हणेल याचा विचार न करितां त्याला विचारलें. परंतु त्यानें हात पुढें करून झाड दाखविलें तेव्हां मला फारच आनंद झाला व माझे स्वप्न अगदीं बरोबर आहे. काय बाबांचा चमत्कार आहे ! असें मनांत म्हणून मी त्या झाडाचें दर्शन घेतलें व त्या झाडाखालील जागा साफ करून थोडा वेळ बसून त्या झाडाची चार पानें घेऊन परत मुंबईस येण्यास निघालों व दर वर्षी शिर्डीला जाण्याचा मनाचा निश्चय केला व मुंबईला घरीं परतलों.

ता. २२–७–६२ रोजीं परत शिर्डीला गेलों व बाबांचें दर्शन घेऊन तेथें शिर्डी येथें गुरुपौर्णिमेला रात्रौ झोपलों असतां मला बाबांनीं दृष्टांत दिला कीं ते माझे घरी

गेले व माझ्या सौभाग्यवतीची एका सुवासिनीकडून बाबानी ओटी भरली व त्या ओटीमध्यें तुळस, गहूं, नारळ या तीन वस्तु होत्या. आणि ते मला म्हणालें की हा नुसता नारळ समजू नकोस. त्याला संपूर्ण तीन डोळे आहेत. एवढे सांगून बाबा निघून गेले, व दुसऱ्या दिवशीं मी मुंबईला परत आलो.

यानंतर माझे सौभाग्यवतीस पाठोपाठ दोन मुली झाल्या त्यामुळें मी अतिशय नाराज होतों. माझ्या आयुष्याचा दीप केव्हा लागेल या विचारांत मी नेहमीच असे. कारण आज पर्यंत मला एकदर सात मुलीच झाल्या. त्यावेळीं मन अस्वस्थ होई. त्यामुळें मी माझ्या पत्नीवरहि रागें भरावयाचा. आमचें दोघाचेही कधीं पटत नसे. मी साधारण मामुली बिडी दुकानदार असून यावरील विवंचनेमुळें माझें कामावर मुळीच लक्ष नसे. परंतु परिस्थितीला तोंड देऊन एवढ्या मुलींचे प्रतिपालन मी करीत होतो, परतु मनाला समाधान नाही. माझे व पत्नीचे मोठे खटके व्हायचे. या सर्व भांडणाचे कारण पुत्रसतान नाहीं हेंच कारण. जसजसें उतारवय होत जाई तस तसें फारच दुःख होई. परतु बाबावर पूर्ण भरंवसा होता. एकवेळ बाबानी येऊन सांगितलें कीं तूं माझे भेटीला येशील त्यावेळीं एकटा न येतां आपल्या पत्नीसह मला भेटण्यास ये

बाबाच्या आज्ञेप्रमाणें २७–७–६१ गुरु पोर्णिमेला आम्हीं दोघेहि बाबाच्या दर्शनास निघालो. तेथें गेल्यावर बाबांना अभिषेक करण्याचें ठरविले. त्या रात्रीं मला एक स्वप्न पडलें. बाबा आम्हा दोघाना घेऊन गोदावरीच्या तिरा जवळ गेले व नदीला मध्यें बाध घालून पाणी आडवून पुलाच्या खालच्या बाजूस आम्हाला बसवून नदी शुद्ध केली. व मध्यें डोंगर आडवा घालून म्हटलें कीं या नदीचे पांच पूर्व भागात वाहील. त्या नदींत आम्हाला स्नान घालून बाबानीं देवळात आणलें व ता. २९–७–६१ ला आपल्या समोर बसवून म्हणाले कीं १००० वर्षापूर्वीची माझे जवळ असलेली ही श्रीकृष्ण मूर्ती ठेविली आहे. ती देण्याकरितां बोलाविलें आहे. ती तुमच्या पदरीं देत आहे तीची जोपासना नीट करा, असें सागून त्यांनीं माझ्या सौभाग्यवतीच्या पदरात ती घातली. व तू अशी दुःखी होऊं नको. खुशाल आनंदानें संसार करा असा दृष्टांत दिला. नंतर आम्ही दुसऱ्या दिवशी मुबईला येण्यास निघालों.

पुढें कांहीं दिवस गेल्यावर सौभाग्यवतीला महिने गेले. तीन महिने गेल्यानंतर पुन्हा बाबानीं येऊन दृष्टात दिला कीं माझे उजवी मांडीवर जी मूर्ती होती ती मी तुला दिली आहे. तिचें नाव अनंत अगर साईनंद असें ठेव. नंतर इतके सांगतात तोंच एक समुद्र दिसला व त्याला यमुना नदी मिळालेली दिसली. तिच्या एका टोकावर एक दैदिप्यमान हिरा चमकत होता. तो आणखी ६ महिने ९ दिवसांनीं जमिनिवर उतरेल व त्याचा प्रकाश सर्व पृथ्वीवर पडेल. त्यावेळीं तिच्या स्वप्नातच प्रश्न केला कीं

एवढासा हिरा त्याचा पृथ्वीवर प्रकाश कसा पडेल. तेव्हा त्यांनी सांगितलें की तुला तें समजणार नाही तर आणखी ३० वर्षांनी आपोआप सर्व लोकाना कळेल. असें स्वप्नांत दिसलें.

नंतर सौभाग्यवतीस ९ महिनें पूर्ण होऊन पुत्र रत्न जन्माला आलें तो दिवस श्रावण शु. सप्तमी मंगळवार होता. मला व माझ्या पत्नीला मुलींना फारच आनंद झाला. बाबाच्या कृपेनें माझे मनोरथ पूर्ण झाले तें मी कोणत्या शब्दानें वर्णावें हेंच मला समजत नाहीं. त्या माझ्या वंशाच्या, वैभवाच्या, शिखरावरील राजहंसाला मी कुठें ठेवू कसा घेवू असें झाले. त्याचें नांव मी अनंत असें ठेविलें. माझ्या आप्त मंडळींना, मित्राना बोलावून व मंगल वाद्यानें त्या अनंतबाळाला हिंदोल्यात घालण्याचा समारंभ मी मोठ्या कौतुकानें पार पाडला.

बाबानी आजपर्यंत येऊन माझ्या मनाचें सांत्वन केलें त्याच्या सर्व गोष्टी मी अथपासून इतीपर्यंत दिला आहे.

---

माणसानें धीर धरून राहिलें पाहिजे. जो धीर धरून राहातो त्याला जे कांही हवें असेल तें मिळू शकतें.

× × ×

तुमच्यापैकी प्रत्येकानें मी विवेकानंदापेक्षा मोठा होणार अशी आकांक्षा बाळगावी. त्यांतच मला आनंद वाटेल. एवढेंच नव्हें तर या भरत भूमीत जन्म घेऊन धन्य झालों असें मला वाटेल.

× × ×

प्रत्येक राष्ट्राने स्वतःच्या पायावर उभे राहून जगलें पाहिजे. परावलंबन नको. अमेरिकेकडून मदत मिळेल या आशेवर काळ कंठणें अत्यंत वाईट. तो नाद आपण सोडून दिला पाहिजे.

× × ×

मी गरीब, दरिद्री असें मानून दुःख करीत बसू नका. पैसा म्हणजेच कांहीं सामर्थ्य नव्हे सद्‌गुणी होणें गुणसंपदा जवळ करणें म्हणजे खरा श्रीमंत होणें. तुम्हीं सद्‌गुणी होण्यासाठीं झटावें तुमच्या हातीं आहे. या जगांत धनाचा नव्हे तर सद्‌गुणाचा प्रकाश सर्वांना दिपवून सोडूं शकतो.

× × ×

मी कोणत्याही एका राष्ट्राचा गुलाम नाहीं. मी सर्वांचा सर्व राष्ट्राचा आहें. कोणताही एक देश माझ्यावर हुकमत चालवूं शकत नाहीं. मी जसा भारताचा आहे तसाच इतर राष्ट्रांचा आहे.

— स्वामी विवेकानंद

# बाबांच्या काळांतील एक घटना

## ह. भ. प. दासगणूनीं केलेला दंभस्फोट

श्री. दासगणू हे शिरडींत असताना एक विशेष प्रसंग घडला. श्री. **सुंदराबाई क्षीरसागर** या नावाच्या एक बाई श्रीसाईबाबाची सेवा करण्याच्या निमित्तानें शिरडीस येऊन राहिलेल्या होत्या. वयानें तरुण, रूपानें नीटस व परिस्थितीनें गतभर्तृका असल्याने लोकांच्या मनामध्यें या स्त्रीविषयीं विशेष कुतूहल असणें स्वाभाविक होतें. श्रीसाईबाबाची सेवा अनेक तऱ्हानी करण्याचा त्या प्रयत्न करीत. श्रीसाईबाबा जात असतील त्या रस्त्याची व मशिदीची स्वच्छता राखणें, त्यांचीं वस्त्रें प्रावरणे निर्मळ धुणें, भाडी घासणे इत्यादि कामें श्री. सुदराबाई मोठ्या तत्परतेने करीत. साईबाबाना मात्र हा सर्व प्रकार रुचत नसे. ते बाईंचा फार राग करीत. शिव्यागाळ तर नेहमींचीच होती; पण क्वचित् बडवूनहि काढीत. या सर्वांतूनहि बाईंनीं आपला उपक्रम सोडला नाही. लोकांच्या मनावर त्यांच्या या निग्रहीपणाचा फार परिणाम झाला. साईबाबाच्या त्या एकनिष्ठ भक्त आहेत, अशी लोकांची दृढ भावना झाली. लोक त्याना फार मानूं लागले. आज शिरडीला आरती, धुपारती, काकडाआरती, चावडी, रथाची मिरवणूक इत्यादि जो सोहाळ्याचा नित्यक्रम आहे, तो सर्व या बाईंनींच कार्यवाहींत आणलेला आहे. लोकांच्यावर छाप कशी ठेवावी, त्यांना श्रीसाईबाबाच्याविषयीं अनेक गोष्टी रंगवून फुगवून कशा सागाव्या, पूजेच्या थाटामाटाकरितां लागणारीं निरनिराळी साधनें, उपकरणें, साईबाबांना अर्पण करण्यास लोकांना कसें प्रवृत्त करावें, ही विद्या या बाईंना चागली अवगत झालेली होती. भक्तीच्या बाह्यागाकडे आकर्षित होणें, पूजेच्या डौलदार पसाऱ्यात रंगून जाणें हें मानवी मनाला स्वाभाविक असेंच आहे; परतु इष्ट मात्र नाही. बाह्यागात रंगणें वा सहज साध्य होणारें हें बाह्याग म्हणजेच खरी भक्ति समजणें, वस्तुतः अत्यंत अनिष्ट असल्यानें श्रीदासगणूंना मात्र हें सर्व अनवश्यक वाटे. लोक तर या बाईंच्या इतके भजनी लागले कीं, ते त्याना राधाकृष्ण आई म्हणत. त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानीत. लौकिकाच्या या वेडातून पुढें न लिहिण्यासारख्या इतरहि अनेक गोष्टी या ठिकाणी होऊं लागल्या.

श्रीसाईबाबांच्यासारख्या वैराग्यभरित, निरिच्छ सत्पुरुषाच्याजवळ अशा तऱ्हेचा पसारा असावा, हें बरें न वाटून दासगणूंनीं या गोष्टीस विरोध करण्यास आरंभ केला.

बाईच्या दिसणाऱ्या आणि मुळात असणाऱ्या स्वरूपामध्यें वेगळेपणा आहे, अशी त्यांना आरंभीच शंका आली होती; पण आतां त्यांच्या सूक्ष्म दृष्टीला अनेक निंद्य प्रकार आढळून आल्यानें त्यांना स्वस्थ बसणें शक्य नव्हतें. लोक तर बाईच्याविषयीं कांहींहि शंका काढणें हें नास्तिकपणाचें मानीत. त्यामुळें श्रीसाईबाबांच्याकडे येणाऱ्या सर्व मंडळींत दासगणू हेच पुन्हां एकटे पडले. बडी बडी सर्व मंडळी एका बाजूस म्हणजे राधाकृष्ण आईच्या पक्षाची व एकटे श्रीदासगणू एका बाजूस असें द्वंद शिरडीस उत्पन्न झालें. प्रत्यक्ष श्रीसाईबाबाच श्रीदासगणूंना अत्यंत अनुकूल असल्याचें दिसत असल्यामुळें विरोधी पक्षीयांना कांहीं विशेष करता येण्यासारखें नव्हतें. मनुष्यस्वभावाची चांगली पारख आणि चाणाक्ष स्वभाव यामुळे श्री. नानासाहेब चांदोरकर मात्र श्रीदासगणूंच्याच मताचे होते. या सर्व प्रकरणाचा आपल्या पूर्वीच्या सवयीप्रमाणें उपहास करण्यासाठीं श्रीदासगणूंनीं एक विडंबनात्मक काव्य लिहिलें. त्याचा प्रसारहि झाला. या काव्याचें वृत्त समजतांच शिरडीस येणाऱ्या एका फार मोठ्या श्रीमान् गृहस्थानें श्रीदासगणूंना बजावून सांगितलें. 'याद राखा. आईच्याकरितां मी तुमच्यावर अब्रुनुकसानीची फिर्याद करीन आणि त्यासाठी कितीहि खर्च आला तरी शेवटपर्यंत लढेन. श्री. चांदोरकराचा वशिला वरच्या कोर्टांतून तुमच्या कामीं येणार नाहीं, हें पूर्ण लक्षात ठेवा." ही गोष्ट घडणें खरोखरीच शक्य होतें. म्हणून उगीच कोर्टकचेऱ्या नकोत, ह्या हेतूनें श्रीदासगणूंनीं आपलें तें विडंबनात्मक काव्य फाडून टाकलें. तें प्रसिद्ध केलें नाहीं. हें सर्वच प्रकरण भक्तीच्या खऱ्या मार्गामध्यें विक्षेप निर्माण करणारें असल्यानें आणि साधकाच्या दृष्टीनें या प्रकारच्या निषेध करणें, अत्यंत अवश्य असल्यानें दासगणूंनीं या वस्तुस्थितीचा निराळ्या तऱ्हेनें उपयोग करून घेतला.

पुणतांबे येथील प्रसिद्ध सत्पुरुष श्रीचांगदेव यांचें कीर्तनोपयोगी आख्यान श्रीदासगणू लिहीत होते. त्या आख्यानाच्या संविधानकात चांगदेवांच्या जवळ एक विगलधवा ब्राह्मणी सेवा करण्यास येऊन राहिली, अशी काल्पनिक घटना गृहीत धरली आणि शिरडी येथील वस्तुस्थितीला धरून तिचें वर्णन केलें.

आर्या—" पुण्यस्तंभीं केला मठ केशवदास चांगदेवांनी ।
तैं त्याजवळ रहाया आलीसे एक ब्राह्मणी तरुणी ॥

अभंग—कुंचा करोनी केसाचा । पंथ झाडी सद्गुरूचा ।
ऐशी निर्वाणीची भक्ति । पाहुनि भोळे आनंदती ।
परि चांगदेवा मनीं । येई तिटकारा क्षणोक्षणीं ।
गणू म्हणे गारे प्रत । पारखी का वाखाणित ॥

साकी—तिची पाहुनी दांभिक भक्ति चांगदेव साधूसी ।
क्षणाक्षणा संताप बहुत ये अनीति ही संतासी ।

घटते का सांगा, द्विज न गौरवी मातंगा ॥

श्लोक—एके दिनीं बहुत कोपाचि चांगयाला ।
आला करें धरुन झोडियलें तियेला ।
त्याचा ति अर्थ उलटा करुनी जगासीं ।
सांगे म्हणे अजि मी पात्र गुरुकृपेसी ॥

दिंडी—साधुपुरुषा संताप कसा येतो ।
काय कौमुदिपासून ताप होतो ।
असे वदती जन बघुनि चांगयाला ।
कुणी न बघती त्यांतील इंगिताला ॥ '

शेवटीं अती झालें, त्यावेळीं कांहीं विचारवंत मंडळी एकत्र झाली. ते बाईस म्हणाले,

पद ( लावणी )—" तूं विगतधवा ब्राह्मणी सकेशा खरी ।
आहेस तरुण त्यांतुनी नको राहूं मठाभीतरी ।
नेसशी धवल पातळा विरक्तापरी ।
डोईस तेल वासाचें, बुचड्यांत सुमनमंजिरी ।
मनगटी मणी तुळशीचे, तुवां बांधिले ।
ढळढळीत तसें निज भाळां, वैष्णवी चिन्ह रेखिलें
चपलता तुझ्या अंगिची, अलौकिक खरी ।
शृंगाररूप मेघांची, तूं वीज मन्मथांबरी ।

चाल कृष्णाची मूर्त ती करीं । धरिली त्वां जरी ।
परि न ती खरी । ढोंग तें चाळे, समजलों आम्ही अंतरी ॥
वाचिशी भारतभागवता । भोळे फसविण्या ।
नको रांधूं मुखीं ज्या दंत, त्या कळाति चाळूच्या कण्या ।
श्रीचांगदेव महासिद्ध, तयांच्या मठीं ।
राहे न सांग शोभे का, केशरा गुवाची उटी ।

चाल गणु म्हणे जेथ अस्सल । तेथ नक्कल फजित पावेल ।
म्हणुन जा दूरीं । नको वर्स सराफा घरीं ॥

ओवी ऐसें बोलून ब्राह्मणी । बाहेर काढिली मठांतुनी......"

असें हें सर्व स्वतंत्र प्रकरण काल्पनिकरीत्या रचून चांगदेवांच्या चरित्रामध्यें समाविष्ट केल्यानें कायद्याच्या कक्षेंत राहून इष्ट हेतु साध्य

करणें, हें सहज सोपें झालें. हें आख्यान शिरडीस त्यांनीं श्रीसाईबाबांचे समोरच कथा करतांना लाविलें. तें ऐकून बाबा हळूच हंसत होते. राधाकृष्ण आईविषयीं आदर असणारी मंडळी मात्र कथेंतून उठून गेली. विरोधी लोक पुष्कळ जळफळले; पण त्यांना आता प्रत्यक्ष कांहींहि करता येण्यासारखें नव्हतें. श्रीदासगणूंच्याविषयीं मनामध्यें आढी धरून त्यातील काहींनीं त्यांना छळण्याचा अनेक प्रकारें प्रयत्न केला, पण श्रीदासगणूंचा हेतु मुळामध्यें अत्यंत सोज्वळ होता. त्याची भूमिकाहि परमार्थतः अत्यंत शुद्ध होती आणि वस्तुस्थितीहि प्रत्यक्षात वर्णन केल्याप्रमाणेंच असल्यानें त्यांना स्वतःला याची काहीहि खंत वाटली नाही. लोकांच्या निंदेला वा उपहासाला वा छळालाहि न मोजण्याइतका खमगपणा त्यांच्या वृत्तींत मूळातच होता.

असें हें कटुतेचें वातावरण बऱ्याच काळपर्यंत टिकलें होतें. हळूहळू थोडी थोडी मंडळी श्रीदासगणूंच्या पक्षाला येऊन मिळूं लागली होती. पुढें या बाई अत्यंत लाञ्छनास्पद स्थितीत मरण पावल्या. पंचनाम्यापर्यंत वेळ आली. कसेंबसें तें प्रकरण मिटवावें लागलें. त्या वेळीं मात्र बहुतेक सर्वांचा भ्रमनिरास झाला आणि श्रीदासगणूंचें म्हणणें शब्दशः किती खरें होतें, हे लोकांच्या प्रत्ययाला आलें. श्रीदासगणूंनीं आपल्या आयुष्यात अनेकांचा असा दंभस्फोट केला आहे.

---

मी जर कशाचा द्वेष करीत असेन तर तो भ्याडपणाचा होय. भ्याडपणा अत्यंत घातुक. तुम्ही त्या दुर्गुणाला जवळ करू नका. मला राजकारण समजत नाहीं. माझा राजकारणावर विश्वास नाहीं. ईश्वर आणि सत्य या दोनच गोष्टीं मी मानतो व त्यांना भजतो. त्याविरहीत बाकी सारा फापटपसारा आहे.

—विवेकानंद


※ उत्कृष्ट कागद ※ आकर्षक रचना

※ स्वच्छ व सुबक छपाई

# बॉम्बे सेंट्रल प्रेस

मुरलीधर टेंपल कंपाऊंड, ठाकुरद्वार पोस्टाशेजारीं

जगन्नाथ शंकरशेट रोड, ठाकूरद्वार मुंबई २

# चढाईखोरांचा पाडाव करा

*******************************

—श्री शंकराचार्य

**शृंगेरी पिठाचे श्री जगद्गुरु श्री शंकराचार्य यांनी सध्यांच्या आणीबाणीच्या प्रसंगी भवान्स जर्नलद्वारें राष्ट्राला उद्देशून पुढील संदेश दिला आहे.**

अहिंसा ही दैवी सपदा आहे. आसुरी संपदेच्या ती विरुद्ध आहे. अहिंसा ही एक प्रकारची तपस्या आहे. त्याचप्रमाणें भगवताच्या चरणापाशीं जाण्याचा तो एक मार्ग आहे. आणि म्हणूनच 'अहिंसा परमो धर्मः' असें म्हटलें आहे.

याशिवाय दुसरीही एक आज्ञा आहे. ती कोणती? 'हन्यादेव अवि चारयत्' कोणत्याहि प्रकारें विचार न करतां शत्रूला हाणावें. या दोन्ही शिकवणुकींचा आपणास सुमेळ घालता आला पाहिजे. जे तुमच्याशीं किंवा कोणाशीही न्यायधर्मानें वागतात त्याच्या वाट्यास तुम्ही जाऊ नका. त्याच्या भावना दुखवू नका. शब्दानें, कृतीनें वा कोणत्याही रीतीनें त्याची मनें दुखवू नका. जे तुमच्यावर आघात करीत नाहीत त्याच्यावर तुम्हीं आघात करूं नका. लहान गोष्टी ज्या तुमच्या मनाविरुद्ध घडतात, त्याच्याकडे दुर्लक्ष करा. त्याना प्रेमानें जिंका.

## दुष्टांना शासन झालेंच पाहिजे

परतु या जगात आततायी व स्वार्थी लोक असतात त्यांचें काय? ते लुटालूट करतात, दुसऱ्याना लुबाडतात, अकारण छळतात, स्त्रियाची अब्रू लुटतात. त्यांचें काय? ते अत्याचार पहातच रहावयाचें काय? नाहीं. त्यांना शासन हे झालेंच पाहिजे. त्यांच्यावर हल्ला करून त्याना नामोहरम करण्यात आलेंच पाहिजे. तेथें दया माया नाही. 'हन्यादेव अविचारयेत्.'

भीम वयानें लहान होता. त्या वयातही त्याची खुमखुमी दिसून यावयाची. ती त्यानें आटोक्यात ठेवावी म्हणून माता कुंती त्याला म्हणे 'बाळ दुसऱ्यांच्या कारभारांत आपण लुडबूड करू नये रे!'

यावर भीम म्हणे, 'असें का, बरें आहे.' मध्येंच अर्जुन म्हणाला, 'बंधो! तुझ्या कामकाजांत दुसऱ्या कोणी लुडबूड केली तर तूं काय करशील रे?'

"मी ती गोष्ट केव्हांहि सहन करणार नाहीं, मी त्याचा तावडतोब समाचार घेईन!" भीमानें उत्तर दिलें.

आमचा भारत शांतताप्रिय आहे. तो कोणाच्याहि कारभारात लुडबूड करीत नाही. शांततेने जीवन घालविण्यासाठी धडपडत आहे, परंतु आमच्या एका शेजाऱ्यानें आपला गैरसमज करून घेतला आहे. त्याला वाटते भारत निर्बल आहे. तेव्हा करा त्याच्यावर हल्ला ! चीन आसुरी वृत्तीचा देश आहे. त्या वृत्तीने त्या देशाने आमच्यावर हल्ला चढवून आमच्या पवित्र भूमीवर पाय ठेविला आहे. यावेळी काय सांगायचें ? कृष्णाने अर्जुनाला सांगितले तेच ! **युद्धस्व** लढाई कर. यावेळी सर्व भारतवासीयानीं एक होऊन शत्रूला निकरानें तोंड दिले पाहिजे. हा हल्ला परतवून देशात शांतता प्रस्थापित करणे हे प्रत्येकाचे काम आहे.

## मी काय देणार?

मी काय देणार ? ज्याने सर्वस्वाचा त्याग केला आहे तो काय बरें देऊ शकणार ? लढाईत माझ्या सारख्याचा काय उपयोग होणार आहे ? परंतु आहे. ज्या आद्य श्री शंकराचार्यांनीं हे पीठ स्थापन केले तें तपस्येच्या, साधुसंतांच्या पुण्याईनें समृद्ध आहे. तपस्येचे मोल कमी समजू नका. त्या खजिन्यातून अंतःकरणापासून मी आमच्या जवानास शुभाशिर्वाद देत आहे. या पीठापाशी दुसरे काही देण्यासारखे नसले तरी तपस्येची संपदा आहे. त्या संपदेचा मी लढाईवर जाणाऱ्या जवानांवर मुक्त हस्तानें वर्षाव करीत आहें.

जे शरिराने बळकट असतील त्यानी यावेळी सैन्यात दाखल झाले पाहिजे. तें त्याचें कर्तव्य आहे. जे धनिक असतील त्यानी आपली धनदौलत युद्ध कार्यासाठीं स्वखुषीने दिली पाहिजे. आपला संरक्षण निधि भरभक्कम झाला पाहिजे. यावेळी आपण सर्वांनी पुढाऱ्याच्या हाकेकडे ओ देऊन त्याचे शब्द झेलले पाहिजेत. माझ्या दैनंदिन प्रार्थना सदैव तुमच्या पाठीशी आहेत.

समरांगणावर गेलेल्या व जात असलेल्या जवानामागे आमच्या राष्ट्रातील यच्चयावत् लोकांच्या शुभेच्छा आहेत. त्यांच्या बळावर आम्हीं जय मिळवूच मिळवूं, अशी मला खात्री वाटत आहे.

**उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें ' लायसॉफ तेल ' वापरा.**

**गिरगांव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी**

# प्रयत्नवादी व निष्ठावान शिष्य

एखादा अगदी साधासुधा व कोणाच्याही डोळ्यात न भरणारा माणूस असतो, परतु त्याचें अतःकरण फार मोठें असते. त्याचा टाव कोणाला घेता येत नसतो. मुगी म्हणजे किती लहानात लहान व यत्किंश्चित प्राणी आहे ! परतु तीही कधी कधी कोणाला शक्य होणार नाही अशी अद्भुत कृति करू शकते.

अलासिंग ही तशीच एक सर्वसाधारण व कोणाच्याही लक्षात न भरणारी व्यक्ति होती. नावावरून अलासिंग कोणी तरी शीख असल्याचा भास होईल परतु तसे नाही. ते मद्रासकडील होते. मद्रास येथील पचाप्पा हायस्कूलचे मुख्याध्यापक होते.

आम्ही सागत आहोत ही १८९२ मधील घटना आहे. स्वामी विवेकानद हे देशभ्रमण करीत करीत मद्रासला आले होते. रा. ब. शकर पाडुरग पडित यानी इग्लड अमेरिकेस जाण्याची त्याना प्रेरणा कशी दिली ही हकिगत या अकातील एका लेखावरून समजून येईल. मद्रासमध्यें स्वामीजींच्या परदेशगमनाला सक्रिय सहानुभूती दाखविणारे अलासिग पेरूमल हे होते.

त्याना समजले होते की अमेरिकेतील शिकागो शहरी एक मोठी धर्म परिषद भरणार आहे आणि ते ऐकून किती आनद झाला आहे त्याना !

## काय ही तळमळ ?

अमेरिकेत भरणारी धर्मपरिषद ! आणि त्या परिषदेत हिंदु धर्माची पताका फडकविण्यासाठी स्वामीजीसारख्याना जाणे शक्य झाले तर काय बहार होईल ! स्वामीजीची कीर्ति त्यानी ऐकिली होती. त्याच्या मनावर काही तरी इष्ट परिणाम घडून आला होता. भारतातून कोणी तरी योग्य माणूस तेथें गेला पाहिजे असे अलासिंगाना वाटू लागले.

स्वामीजी मद्रासेत येताच त्याची भेट घेण्याची सधी त्यानी साधली. परिचय करून दिल्यानतर ते स्वामीजींना म्हणाले, 'स्वामीजी शिकागो येथील धर्म परिषदेला तुम्ही का जात नाही ? जाणे जरूर आहे असे वाटते !'

स्वामीजींनी त्या प्रश्नाचें उत्तर एकदम नाहीं दिलें. त्याच्या मनात तशा प्रकारचे विचार घोळू लागले होते, परंतु त्याना मूर्त स्वरूप द्यावें कीं नाहीं या विचारात

ते होते. तो शिवरात्रीचा पवित्र दिवस होता. त्या दिवशी रात्रीच्या प्रहरी विचार करून अमेरिकेस जाण्याचा निर्णय स्वामीजींनी घेतला. परंतु इतक्या दूरवरचा प्रवास। साधी का गोष्ट होती ती! खर्चाचें काय? हा बिकट प्रश्न सोडवायचा होताच.

अलासिंगाना स्वामीजींनी आपला निर्धार निवेदन केला व मार्गातील अडचणींचीही जाणीव करून दिली.

स्वामीजी म्हणाले होते की, 'मी शिकागोला जावें अशी जर जगन्मातेची इच्छा असेल तर माझें जाणे होईल. आणि त्यासाठी त्या कार्यार्थ हातभार लागावा तो सर्वसाधारण लोकांचा.'

## यश कसें मिळविलें?

त्याप्रमाणे अलासिंग जरूर तो निधि जमा करण्यासाठी बाहेर पडले, उत्साहाने त्याचें अतःकरण पेटलें होतें. काहीं होवो. लाज, भीड सारें काही गुंडाळून ठेऊन दारोदार भिक्षा मागावयाची व स्वामीजीसाठी निधी गोळा करावयाचा! एकदा का धगधगत्या, पेटत्या अतःकरणानें तुम्ही बाहेर पडला म्हणजे इतरांचीहि अतःकरणें तुम्हीं पेटवूं शकता. तसेंच झालें. अलासिंग जेथें जेथें गेले तेथें तेथें त्याना यश मिळालें. त्याना रिक्त हस्तानें कोणीहि पाठविलें नाहीं.

अलासिंग किती साधी व्यक्ति; परंतु सद्भावनेनें भारावलेली व सत्कृत्य पार पाडण्यासाठीं बद्धपरिकर झालेली व्यक्ति. अशा व्यक्तीला यश नाहीं मिळणार तर तें कोणाला मिळणार?

स्वामीजींना बोटींत बसलेले व आपल्या पवित्र प्रवासाच्या मार्गास लागलेले पहाण्याची अलासिंगाची फार मोठी इच्छा होती. ती पूर्ण करण्यासाठी स्वामीजी मुंबईहून ज्या बोटीनें जाणार होते त्या बोटीवर हजर राहून स्वामीजींना निरोप देण्यासाठीं ते मुद्दाम मुंबईस आले! केवढी आस्था; केवढी तळमळ!

बोट धक्क्यापासून वेगळी होण्याचा समय येऊन ठेपला, स्वामीजी व अलासिंग एकमेकांच्या हातात हात घालून बोटीच्या दरवाजापाशीं उभे होते. विभक्त होण्याची वेळ येताच स्वामीजींच्या नेत्रातून घळघळ अश्रू वाहूं लागले. त्यानीं अलासिंगास कडकडून मिठी मारिली व भरल्या नेत्रानीं त्याचा निरोप घेतला.

## दूरदृष्टीचा परिणाम

ज्या कार्यासाठी आपण एवढे परिश्रम घेतले व झटलों त्याचे भावी काळातील परिणाम काय आहेत याची अलासिंगाना कल्पनाही त्यावेळी नसेल. नंतर उभयतांमध्ये जो पत्रव्यवहार झाला त्यावरून आढळून आलें कीं, स्वामीजींच्या, अमेरिका गमनास बहुतेकाशीं तेच कारण झाले होतें. तसें करण्यात आपल्या देशाचें काही ना भलें

होण्याचा संभव आहे असे मात्र त्यांना वाटलें असावे. आतां मात्र आपण मागे वळून त्या घटनेकडे पहातो तेव्हा खरोखर स्वामी विवेकानंद अमेरिकेस गेले यात भारताचेच नव्हे तर जगाचेहि कल्याणच झालेले आहे. भारताचे तर कोटकल्याण आलें आहे असे म्हणता येईल.

त्यानतर स्वामी विवेकानंद यांचा अमेरिकेंतील विजयी दौरा चालू झाला. त्यासंबंधीच्या बातम्या या देशांत येऊन थडकूं लागल्या. हिंदी जनतेच्या उत्साहास उधाण येऊं लागले. अलासिंग हे सर्व बारकाईने पहात होतें. या उसळत्या उत्साहाचा योग्य मार्गाने फायदा करून घेतला पाहिजे, असे त्याना वाटू लागले. लोकात पराभूत व परधार्जिणी मनोवृत्ति बळावलेली होती. स्वधर्मावरील विश्वास डळमळूं लागला होता. अशावेळीं अलासिग यानी मद्रासमध्यें 'ब्रह्मवादिन्' या नांवाचे एक मासिक सुरू करण्याचें ठरवून स्वामी विवेकानंद याच्या सहकार्याने ते सुरू केलें व उत्तम प्रकारें चालविलें. धार्मिक व तत्त्वज्ञानविषयक मासिक चालविणे, त्यासाठीं वर्गणीदार मिळविणें व ते लोकप्रिय करणें ही साधीसुधी का गोष्ट आहे! परतु अलासिंग हे उद्योगी व जबरदस्त प्रयत्नवादी होते. त्या गुणांच्या बळावर त्यांनी संकटांवर मात केली.

### स्वामीजींना जाणीव

अलासिंग स्वभावाने फार गोड व ज्याच्या त्याच्या उपयोगी पडण्यास नेहमीं तयार असत. त्यामुळें त्याचे मित्रमंडळ फार मोठें होते. सुप्रसिद्ध कवि सुब्रह्मण्य भारती हे त्याच्या मित्रापैकींच एक होते. वयाच्या ४४ व्या वर्षी १९०९ साली त्यानी इहलोकची यात्रा संपविली. ते देहाने गेले तरी त्यांची स्मृति अजूनहि कायम आहे व पुढेंही दीर्घकाळ ती राहील.

स्वामीजीचे निर्याण त्यापूर्वीच झालेलें होतें; परंतु ते हयात असेंपर्यंत त्या उभयताचा सतत पत्रव्यवहार चालू असे. स्वामीजीनीं त्यांची योग्यता बरोबर ओळखली होती.

स्वामी विवेकानद याच्या सपूर्ण ग्रथांची जी आवृत्ति निघाली आहे, त्यात अलासिंग यास स्वामीजीनी पाठविलेली कित्येक पत्रें समाविष्ट झाली आहेत.

त्यांच्या सबंधानें स्वामीजी एके ठिकाणी म्हणतात, "या जगात अलासिंग याच्यासारखीं माणसें क्वचितच आढळून येतात. निःस्वार्थ, परोपकारी, सतत उद्योगात रत असलेले व गुरूवर संपूर्ण निष्ठा ठेवून जगांत वावरणारे लोक आजकाल कितीसे सांपडतील!"

स्वामी विवेकानंद यानी ज्यांच्यासबंधी असे उद्गार काढले त्यांची योग्यता खरोखर किती थोरें असली पाहिजे?

---

# मी व माझें अस्तित्व

लेखक : केशव कृष्ण प्रधान

## लेखांक ६ वा

सद्गुरु म्हणजे सत् वस्तूशी एकरूप झालेला पुरुष. सद्गुरु आणि जगातील सामाजीक व राजकीय प्रातात प्रसिद्धीस आलेले थोर पुरुष यात कल्पनातीत फरक असतो, हे समजण्यास माणसाला खऱ्याखुऱ्या सद्गुरूची भेटच व्हावी लागते, सद्गुरुच्या सान्निध्यात साधकाला काय वाटते त्याची थोडीशी कल्पना खालील वर्णनात मी आपल्याला देण्याचा अल्पसा प्रयत्न करीत आहे.

### सभोवताली मंगल वातावरण

परमात्मस्वरूपाशी एकरूप झालेल्या पुरुषाच्या भोवतालचें वातावरणसुद्धा आपोआपच फार प्रफुल्लीत असे असते. आपण एखाद्या लग्न, मौजीसारख्या कार्याला गेलो असताना कार्यमंडपात भोवतालची रोषणाई, उत्तम पोषाखानी नटलेली व लगबगीने हालचाल करणारी उल्हसीत अशी स्त्री–पुरुष व मुलें, सनई किंवा बॅंडसारखी भोवताली वाजत असलेली मधूर वाद्ये, व त्यातच हवेवर दरवळणारे अत्तर गुलाबपाण्याचे सुगंध यामुळें फारच प्रसन्न वातावरण जसे असते, तसेच वातावर सद्गुरुच्या भोवती नेहमीच कसे असतें त्याचे फार आश्चर्य वाटतें. मानवाच्या अतःकरणातील अतिशय पवित्र, महान् मंगलमय अशा विचाराचा व कल्पनाचा एक परमोच्च सगम मूर्त स्वरुपात सद्गुरु भोवती सदोदीत वावरत असतो. मी या महान् पुरुषाला भेटण्यासाठी जरी एका झोपडीवजा घरात गेलों होतो तरी देखील त्याचें पुण्यदर्शन होताच मला एकाएकी मी एका शुभ्र संगमरवरी दालनात प्रवेश केला आहे कीं काय असे वाटू लागले. तेथील प्रत्येक वस्तू ताजा स्वच्छ व टवटवीतपणा धारण करून जणू काही एक दिव्य, प्रमुदीत मुद्रेने माझ्याकडे हंसून पहात आहे असें मला वाटले. हिमालयाच्या उच्च बर्फाच्छादित शिखरावर उगवत्या सूर्यनारायणाचे स्वच्छ धवल किरण पडावे व तो सर्व भाग चकचकीत शुभ्र मंगलमय व्हावा असे वातावरण पसरले होतें. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूताचा दिव्य सगम आपल्या शरिराच्या ठिकाणी धारण करून त्यामागील परमऐश्वर्यरुप आत्मस्वरुपाच्या दिव्य तेजांचा साज त्यावर

चढवून ती महान् मंगलमय मूर्ति मला मानवी जीवनाचा गूढ अर्थ समजावून सांगण्यांस उत्सुक झालेली दिसली. 'गंगा, सिंधू, सरस्वतीच यमुना गोदावरी नर्मदा' या भारतखंडामधील पवित्र देविस्वरुप असलेल्या नद्यांच्या जलौघाप्रमाणे ज्याच्या मुखातून केवळ अमृतवाणीच स्रवू शकेल अशा त्या महापुरुषाची व माझी ती भेट होती.

**'बरें झालें ! आलास !'**

त्या भेटीमध्ये मानवाच्या अंतःकरणात—मनःसमुद्रावर उठणाऱ्या प्रचंड लाटा व आकाशाला थेट भिडणाऱ्या मानवाच्या कल्पनेची झळाळी म्हणजे काय, व त्यामागें कोणता दिव्य, शाश्वत, अमृतमय व सुखदायी अर्थ भरलेला आहे ते विशद करण्याची शक्ति होती. उत्क्रांतीतील, थेट रानटी अवस्थेमधील मानवापासून तो आजच्या आधुनिक सुधारणेच्या शिखरापर्यंत उत्क्रांत झालेल्या मानवाच्या जीवनातील सर्व विचार, भावना व कल्पना यांचा सांगोपांग विचार कौशल्यानें स्वच्छ तऱ्हेने मला समजावून सांगण्याची क्षमता त्या दिव्य वाणीत होती. प्रत्येक मानवी जीव अविद्येच्या खोल अंधारांतून हळुहळू अनंत जन्मानंतर शुद्ध सच्चिदानंदाच्या प्रकाशापर्यंत कसा प्रवास करतो, याचा सर्व इतिहास सांगण्याची अचूक शक्ति त्या महान् वाणीत सामावलेली होती. एखादे तेजस्वी लखलखणारे रत्न केराकोपऱ्यात बुजून गेलेले असताना, त्या रत्नावरील धूळ साफ करून त्याचे अनंत जन्म चकाकत राहातील असे पैलू पाडणाऱ्या शिल्पज्ञाची चतुराई त्या महान् पुरुषाच्या ठिकाणी पूर्णपणे वास करीत होती. माझ्याकडे आपले पौर्णिमेच्या चंद्रासारखे तेजाने स्रवणारे कमलनेत्र रोखून 'बरें झाले आलास. मी तुझीच वाट पहात होतो' असे मला दिव्य वाटणारे आशादायी उद्गार त्या महापुरुषाच्या तोंडून बाहेर पडले.

'इतरेजनामध्ये व तुझ्यामध्यें सकृतदर्शनी विशेष फरक नाही. तरी देखील मी तुझीच वाट या ठिकाणी पहात बसावे हे आश्चर्यच नव्हे काय?' असा रोख ठोक सवाल त्यांनी मला विचारला. आणि माझ्या उत्तराची वाट न बघता तेच पुढे बोलू लागले. 'नाहीतरी मानवी जीवन हें अपूर्णच आहे. पूर्णावस्थेची स्थिती सुखशांती आणि समाधान यांनी नटलेली. तर मानवाची अपूर्ण स्थिती सुख दुःख, राग लोभ, सत्य असत्य, सौंदर्य कुरुपता, यांनी घटकेत चांगली, घटकेत विकृत अशी झालेली पूर्णावस्था स्थीर, अविनाशी, अमर, सतत तशीच असलेली तर अपूर्णावस्था तेरड्याच्या रंगाप्रमाणें विविध रंगांची सतत रंग पालटणारी. मानवाचे वेडे मन एखाद्या लहान बालकाप्रमाणे अपूर्णावस्थेलाच पूर्णावस्था समजते, त्याला तू तरी काय करणार? आकाशातील रंग पकडण्यास पाहाणाऱ्या वेड्या पक्षांप्रमाणे किंवा वर्षाऋतूंत स्रवणाऱ्या गगनमौक्तीकाना जपून ठेवणाऱ्या गोष्टीतल्या राणीसारखी

मानवांची स्थिती आहे. आनंद फार वेळ टिकत नाही. दुःखही फार वेळ टिकत नाहीं. फार वेळ न टिकणाऱ्या या सुखदुःखाच्या ऊर्मी म्हणजेच मानवी जीवन! टिकाऊ कांहीं तरी आपणास हवे असा ध्यासच कुणाला नाही. त्याला मी तरी काय करणार? मला खूप वाटतें की, तुम्हाला चिरंतन, शाश्वत, अमर, नेहमी टिकणारे, आनंदमय असे कांहीं तरी द्यावे, पण ती घेण्याची तीव्र इच्छा-तेवढी तरी तुम्हाला व्हायला पाहिजे ना! तुला पाहून मला फार आनंद होतो. कारण बालपणापासून तू कोठे तरी दूर दृष्टी लावून कशाचा तरी शोध करीत आहेस तुझ्या मनातील निर-निराळ्या विचारांच्या उर्मींच्या व कल्पनांच्या मागे काय अर्थ भरला आहे. हे शोधण्याचा तुझा प्रयत्न फारच स्तुत्य आहे. काव्यात, वाङ्मयात, तत्वज्ञानात जें एक आत्मीक गूढगुंजन असतें त्याचा अर्थ काय? ते समजल्याशिवाय तुला चैन पडत नाही हे खरे ना? त्यांतूनच पुढें मानवी अंतःकरणांतून उठणाऱ्या मन कल्लोळाच्या मागें जाण्याची गति तुला प्राप्त होणार आहे. म्हणूनच एवढ्या तातडीने मी तुला माझ्याकडे खेचून आणले आहे. अशाच लोकांची मला गरज आहे.

### मानवाचें सर्वसाधारण जीवन

मी सर्वसाधारण मानवांविषयी बोलतच नाही. रोज उठावे, रोजच्या कार्यक्रमात निमग्न व्हावें, हसावें, खेळावे, रडायची वेळ येईल तेव्हां रडावे-निसर्गाच्या नियमा-प्रमाणे दररोज थोडे थोडे वयानें मोठे व्हावें-म्हातारे व्हावें-चारचौघासारखे बोलावे. भाजीपाला कपडालत्ता यांच्या भावाच्या चढउताराविषयी नित्य बोलावे, यमी ठकीची लग्नें, बाबूचा शिक्षणक्रम व त्यात त्याची प्रगती-वरिष्ठाच्या संवयी-मी असें केले-मी शहाणा-अमक्यानें भरपूर पैसा मिळविला-आम्हीसुद्धा मिळविला असता-पण जरा असें चुकले-शेवटीं सर्व नशिबावर आहे, वगैरे उद्गार काढीत काढीत मजेंत असावें. अशा लोकांविषयी मी बोलतच नाही. रानावनात शेकडों वनस्पती उगवतात व मरतात-शेंकडों जीवजन्तु जन्माला येऊन नाहीसे होतात. झाडाला फुलें, फळे शेंक-ड्यानी येतात व गळून पडतात. शेकडों जनावरें जन्माला येतात व मरतात. त्याप्रमा-णेच या लोकाची जीवनयात्रा असतें. याचा अर्थ मला जगात मानवजातीच्या कल्याणार्थ सामाजिक, आर्थिक, किंवा राजकीय बाबतींत काही सुधारणा करून गत झालेल्या मानवाबद्दल फार मोठ्या आदरानें कांहीं बोलायचे आहे असेही नाहीं. 'गतानु गतिको लोकाः' या संस्कृत सुभाषिताप्रमाणें काही छोटे तर काही मोठे लोक जगात जन्माला येणारच. त्याच्यात वाद नाही. परंतु जीवनात माणसाला त्या जीवनाविषयीच खोल प्रश्न कसे पडत नाहींत, याचेच मला राहून राहून आश्चर्य वाटतें. तुम्ही कांही वर्षे जगाल अगदी जीवन ओघाबरोबर जगाल. परंतु एकदा हे सर्व तेच नेंच असून त्यांत कांही नाविन्य नाही हें कळल्यावर तरी हें जीवन आहे

तरी काय ? असा प्रश्न कधीतरी आपल्या मनात यावयास पाहिजे. नाही का ? मला वाटतें की, हा प्रश्न नैसर्गिकच आहे व नंतर आणखी जीवनांत सतत तेंच तेंच करावयाला लागल्यावर तर हा प्रश्न फारच तीव्रतेनें आपणास जाणवावयास लागला पाहिजे.

### आश्चर्याची गोष्ट

माणूस हा प्राणी एवढा का क्षुल्लक आहे की, मेंढराच्या कळपासारखें कोणीही काठी घेऊन त्यास रोज रोज तेंच करावयास प्रवृत्त करावे व त्यानें त्यांतच आपली सर्व मजा आहे असे समजून वागावें ? सर्व शरीरात खेळणारें चैतन्य, अंतरगांत म्हणजे मनांत महासमुद्रापेक्षांही जोरानें उठणाऱ्या पर्वतप्राय लाटा, थेट आकाश भेदून पलीकडे जाण्यास धडपडणारी अचाट बुद्धीमत्ता, या सर्वांचा परिणाम मानवाला या भोवताली दिसणाऱ्या अधिभौतीक सृष्टींत एखाद्या जमिनीवर वळवळणाऱ्या क्षुद्र किड्याप्रमाणे बांधून ठेवण्यातच होत आहे काय ! नश्वर असलेल्या या भोवतालच्या कालनामरुप जगापलीकडे आपल्याला नीट डोकावून पहाता यावें ही इच्छा त्याच्या मनांत कधीच निर्माण होत नाही का ? कां तें आपणाला कधीच जमणार नाही म्हणून तो तसले प्रश्न तसेच न सोडवता सोडून देतो ! मृत्युपलीकडे काय आहे हे पाहण्यास घाबरण्याइतका मानव भेकड आहे तर ! रात्रंदिवस पैसा, मान मरातब, स्वप्रतिष्ठा, आपला संसार, यापलीकडे मानवास कांहींच सुचू नये काय ! बरें, त्यातून शाश्वतसुख मिळत नाही हें कळून सवरूनसुद्धा मानवाचे विचार त्याला या आत्यंतिक सुखाच्या शोधार्थ कसे प्रवृत्त करीत नाहींत, याचेंच मला फार आश्चर्य वाटतें.

जगांतील सर्व तत्ववेत्त्यांचे ग्रंथ मानवाला वारवार बजावून सांगतात की भोवतालचें विश्व हें आपणच आपल्या मनबुद्धीतून निर्माण केलें असून तें खरोखर अस्तित्वांत नाहींच. हें विधान वरवर विचार करणाऱ्याच मानवाला नाहींतर एखाद्या शास्त्रज्ञालासुद्धा मूर्खपणाचें वाटेल. नुसत्या वेदान्त्यानें जगाला माया म्हणणें व प्रत्यक्ष श्रीरामदासासारख्या सूज्ञ संतानें

**" अरे जें झालेंचि नाही त्याची वार्ता काय पुससी "**

असें विश्वाविषयी म्हणणें यांत जसा फरक आहे तसाच फरक रामदासासारख्या संतानें जग हें निर्माणच झालें नाहीं असें म्हणणे आणि आधिभौतिक सृष्टीचा ठाव घेणाऱ्या एनस्टीन्सारख्या शास्त्रज्ञ श्रेष्ठांनी जगांतील प्रत्येक गोष्टीचें आस्तित्व हें सापेक्ष आहे, दुसऱ्या गोष्टीच्या अस्तित्वाच्या गृहितावर अवलंबून आहे, असें शास्त्रीयारित्या पटवून देणें यात तर फारच फरक आहे. तेंव्हा हा सर्व अध्यात्मीक व आधिभौतिक

विचारवताच्या मताचा विचार केल्यास 'खर तरी काय आहे ' हा साधा विचार कोणत्याही विचारवत मानवाच्या मनात उत्पन्न होणे सहाजीकच नाही काय ?

## खोल विचार करण्याची जरूरी

म्हणूनच मला वाटते की जीवनात खराखुरा आनद, सुख व समाधान जर मानवाला मिळवावयाचे असेल तर त्यानें जीवनाच्या सर्व अगोपागाचा खोल विचार करण्यास शिकले पाहिजे. नुसता वरवर विचार करून चालणार नाही ते एकप्रकारे शुष्कनीरस जीवन जगल्यासारखे होईल. जीवनाचा खराखुरा अर्थ ज्याला समजावून घ्यावयाचा असेल त्याला सर्व गोष्टीवर खोल खोल विचार करण्याची सवय जडवून घेतली पाहिजे. आता मनुष्याची खोल विचार करण्याची प्रवृत्ति नैसर्गिक आहे का ती फक्त काही मानसिक बौद्धिक विचाराची पातळी गाठल्यावरच माणसात निर्माण होते हा एक प्रश्नच आहे.

खोल विचार करण्याची सवय एकदा का माणसाला लागली कीं, तो मनात उद्‌भवणाऱ्या प्रत्येक विचाराच्या अगदीं खोल खोल शेवटाला पोहचण्याचा प्रयत्न करतो. अशा तऱ्हेनें जन्मल्यापासून मरेपर्यंत मनात येणाऱ्या अनत विचाराचा तो निव्वळ ठावच घेऊ पाहातों.

## सुख, शांति व समाधान

असें म्हणतात कीं, मनुष्याच्या मनात उद्‌भवणाऱ्या प्रत्येक विचाराच्या मागें त्या विचाराचे उगमस्थान असते व त्या उगमस्थानापर्यंत प्रत्येक विचाराचा धागा धरून जर माणसाला जाता आलें तर शेवटीं तो अनतामागील एकत्व जो परमेश्वर त्यापर्यंत थेट जाऊन पोहचतो व त्या ठिकाणी त्याला मूळ स्वरुपातील अगाध, अफाट, अबाधित, अविनाशी असे सुख शाती आनद याचे दर्शन होते, इतकेच नव्हे तर अशा सतत् अभ्यासाने तो स्वतः मूर्तिमत सुख, शाती समाधान याच्याच अविनाशीत्वाचा एक अविभाज्य असा घटक बनतो परतु प्रश्न असा आहे कीं मुळात स्वरुप सुख, शाती, समाधान असे हे विचार त्याच्या मूळ स्वरूपातून सुटल्यावर त्याच्या पुढच्या प्रवासात इतके चपल थैमान घालणारे कसे होतात ? का त्याच्या मूळ रुपांतील चैतन्यामुळे त्याना स्थीर स्वरुप न मिळता विजेसारखे चपलरूप मिळून ते वाटेल तिकडे प्रवासाला निघालेल्या लहान मुलासारखे दांडगाई करू लागतात ? पण त्यानी अशी दाडगाई केली तर हा आमचा जीवनरथ चार बाजूला चार दाडग्या घोड्यानीं ओढल्यामुळें कुठे तरी जाऊन आदळून त्याचा चक्काचूर होईल ना ! त्याची आम्हाला फार भिती वाटते. आणि ही भीति वरवर पाहता आम्हाला साधार वाटते. अहो चैतन्यस्वरुप पण स्थीर धीरोदात्त न डगमगणाऱ्या अशा आत्मस्वरूपाचे खरेखुरे

सारथ्य जोपर्यंत आमच्या जीवनरथाला मिळत नाही, तोपर्यंत हा रथ असाच वेडा-वाकडा धावणार. परंतु जशी म्हातारी माणसे चैतन्यानी फुललेल्या मुलाना दाडगाई करताना पाहून 'अरे असे करू नका, तसे करू नका' अशी सारखी ओरडून स्वतःची दुर्बलता दाखवित असतात. व त्या मुलाची जीवनातील गम्मत नाहीशी करतात, तसे आम्ही जर आमच्या विचाराना सतत दाबत गेलों व सतत त्याना त्याच्या उगमाच्या स्थितीचें म्हणजे शांती, समाधान, सुख याची आठवण दिली नाही तर जीवनातील बरीचशी गमत आम्ही गमावून बसू हे निर्विवाद आहे. अहो, नुसत्या सुख शांती समाधानातच गमत आहे काय? निराशेत दुःखात गमतच नाही? निराशेत आशेमुळे गमत आहे. दुःखात सुखामुळे गमत आहे. भीतीत धैर्यामुळे गमत आहे जेवढी तीव्र निराशेची गमत, तेवढीच तीव्र आशेची गमत. जीवनाचा रंग, खराखुरा रंग हा असा आहे.


स्थीर शांत समुद्रात बोट चालली—फार वेळ चालली तर कटाळा येतो. तोच वादळ आले, लाटा खालीवर होऊन बोटीला हेलकावे देऊ लागल्या की, गमत येते. महातुफान झाले. बोट फुटते की काय व आपण मरतो की काय अशी भीति निर्माण झाली व नतर सर्व शांत झाले म्हणजे एका महान संकटांतून सुटल्याचा जो आनंद होतो तो काही निराळाच असतो. तसेच विचाराचे आहे. विचारांनीं थैमान माजवले, तरच ते जिवंत चैतन्यशाली विचार! विचार मनाच्या सर्व थराना वरखाली करून हलवू लागले की, जीवनरथ डळमळतो व नतर याच चर्वणातून जेव्हा का सुख, समाधान शांती निर्माण होते तेव्हा त्याची चव काही औरच असते हे खरे ना! मग विचार फार जोरात चालले तर ते पुरुषार्थाचें लक्षण न समजतां घाबरून का जाता? जीवनाच्या रसाशी एकरूप व्हावयाचे असेल तर मनाची पातळी नी पातळी घुसळून निघाली पाहिजे. जीवनाच्या सर्व रसाशीं एकरूप होण्यासाठीं विचाराना हे कार्य करावेंच लागते कवी, लेखक, वाङ्मय विशारद, तत्ववेत्ते हे सर्व अशाच तऱ्हेने सर्व तऱ्हेचे जीवन आतल्या आत या विचाराच्या घुसळणाऱ्या वृत्तीमुळे जगतात व सर्व जगाशी एकरूप होतात. जीवनाच्या रंग व वृत्ति नाचणाऱ्या, थयथय करणाऱ्या कारंज्यासारख्या आहेत. अगदी खरे आहे हे. परंतु ह्या जीवनाच्या रंगातील खरी गंमत उपभोगण्यासाठीं प्रथमतः या सर्व विषयांच्या भावनांच्या कल्पनांच्या मागे उभा राहा-णारा तो शाश्वत निरामय निर्गुण सच्चिदानंद आत्मस्वरूप प्रभू प्रथम अनुभवला पाहिजे. त्याचा जो पर्यन्त अनुभव आला नाही, तोपर्यन्त भररात्री घोररानातून प्रवास करणाऱ्या वाटसरूप्रमाणें प्रत्येक ठिकाणी जरा काहीं खुट्ट झाले की कोणी श्वापद चोर किंवा भूत आहे कीं काय व आता माझे कसे होणार असें वाटणाऱ्या वाटसरूसारखी मानवांची स्थिती होणारच. 'वाजे पाऊल आपले म्हणे मागे कोण आले' असें

मानवाला त्याच्या जीवनात वारवार होते व तो दचकतो. कोणती तरी परिस्थिती माझ्यावर घाला घालील की काय, मी एकदम गरीब तर होणार नाही ना, माझ्या भोवतालचे सगे सोयरे मला सोडून तर जाणार नाहीत ना, मी ह्या जीवनात एकाकी तर पडणार नाही ना, ह्या भीतीनें बारंवार ग्रस्त होणारे हें मानवी जीवन आपल्याला सौख्यपूर्ण, कायम सुखी करावयाचे आहे ना ? तोच चिरतन सुखाचा मार्ग मला तुला दाखवायचा आहे. बरें झालें तू आलास. नेहमी असाच येत जा.' इतकें बोलून त्या महापुरुषानें मला तात्पुरता निरोप दिला.


## जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठी बलवान बना**:–यासाठी लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणे म्हणजे डंबल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कादिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्ड, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रे, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहा:...



लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स, ८५ बापू खोटे स्ट्रीट, जामळी मोहोल्ला, मुंबई ३

# श्वाना ऐसा—

लेखक : द. श. टिपणीस

लहानश्या जतूपासून उत्क्रांति होत होत माणूस निर्माण झाला असें म्हणतात. यामुळे पूर्वयोनींतील सर्व गुणधर्म, चागले वाईट माणसाच्या ठिकाणीं बीज रूपानें असतात असा सिद्धात कांहीं शास्त्रज्ञांनी काढला आहे. तो खरा असो वा खोटा असो पण एवढे मात्र खरें की मानवी मनात अनेक योनींतील प्राण्यांचे विकार असतात असे रोजच्या व्यवहारात अनुभवास येते. सापाची दंशवृत्ति, सिंहाचा शूरपणा, सशाचा भेकडपणा, कोल्ह्याचा कावेबाजपणा, वाघाचा क्रूरपणा, मांजराची लोचटगिरी, कुत्र्याची आल्या गेल्यावर भुंकण्याची संवय, धन्याबद्दलची निष्ठा, घोड्याचा वा हत्तीचा उमेदपणा, गाढवाचा गाढवपणा, कावळ्याची चोच व घारीची दृष्टी वगैरे पशुपक्षाच्या ठिकाणीं असलेल्या विकाराची बीजें मानवी मनात असल्याचा अनुभव व्यवहारांत येत असतो. यांतील चांगले मनोविकार वाढीस लावून वाईटाना सयमानें वा दमानें काबूत ठेवणें हें मानवाचें आद्य कर्तव्य आहे. हे कर्तव्य चोख केलें तरच मानवतेचें बीज वाढीस लागून मानवता फळाफुलास येईल. म्हणून यातील निकृष्ट विकाराबद्दल बाबानीं वेळोवेळीं आपल्यास सावधगिरीचा इषारा दिला आहे. अशा मनोविकारांपैकीं कुत्र्याप्रमाणे आल्यागेल्यावर भुंकण्याची वृत्ति, प्रामुख्यानें आढळून येते. बहुतेक लोकांना ही संवय असत. कोणाला काही व्यवस्थित सागण्यापेक्षां, अगर त्याचे ऐकून घेण्यापेक्षां एकदम त्याच्यावर घसरा घालण्याची वृत्ति पुष्कळ वेळा पहाण्यांत येते. कोणी अनोळखी दाराशी आल्यास मग तो भिकारी असो वा दुसरा कोणी असो एकदम कुत्र्याप्रमाणे भों भों करून घसरा घालण्यात येतो. कोण, काय, कशासाठीं याची चौकशी नतर. अगोदर भों भों करून मोकळा. अशी श्वानवृत्ति असलेल्या माणसास बाबा सांगतात देऊं नको परी वसवसा । श्वाना ऐसा वर्तूं नको ॥ १९–१४२ ॥ असें कां ? आल्या गेल्यावर वसवसा कां करु नये ? बाबा कारणही सांगतात तें अवश्य ध्यानीं घ्यावें.

## कोणावरही भुंकूं नको

जें घडतें तें काहीं कारणानें घडतें. उगाच कांहींच घडत नाहीं. कारण समजले नाहीं म्हणजे उगाच सहज असें शब्द आपण वापरतों एवढेच. कारणामुळे कार्य होतें. व कार्यामुळें निर्माण होतें. कार्यांकारणाचें अखंड वर्तुळ आहे. कर्मांची ही

साखळी आहे. रहाटगाड्याच्या साखळीरूपी पट्ट्यामुळे त्याची चाके फिरत असतात. कार्य करणाऱ्या साखळीमुळे चराचराची कर्म चक्रे फिरत राहून जगाचे रहाटगाडगे सतत चालत राहते. आपल्या जीवनात नाना व्यवहार व घडामोडी होत असतात. व अनेक व्यक्तींशी आपला रोज संबंध येत असतो. ज्यात विरोधाभास भरपूर आढळेल अशा किती तरी चमत्कारीक वाटणाऱ्या गोष्टी हरघडी आपल्या अनुभवास येतात. घरातील मुलांशी करड्या शिस्तीने वागणारे गोपाळराव शेजारच्या मुलांशी लाडीकपणे वागतात हे दृश्य अपरिचीत नाही. कुत्र्याच्या चार पिलांपैकी एखादे पिलू आपले मन आकर्षीत करून घेते व त्याला आपण पाळून मुलाप्रमाणे त्याच्याशी जीव लावतो. एखादा अनोळखी माणूस संकटकाळी अचानक येतो व ममतेने मदत करून आपणास मुक्त करून जो जातो तो पुन्हा म्हणून जन्मात भेटत नाही. अशी उदाहरणे काही थोडी थोडकी व थोड्याच्या पहाण्यात नाहीत असें नाही. असे का हा प्रश्न आपल्या मनात उद्भवतो व नशीब, देवाची कृपा असें काही तरी उत्तर देऊन आपण तो निकालात काढतो. परंतु याला बाबाचे उत्तर असे आहे की—

नसल्या लागा बाधा काही । कोणीही कोठेही जातच नाही ।
नरास काय पशुपक्षाही । न करी कुणाशी हडहड ॥ २१०–१४१.

**पूर्वसंबंधाशिवाय कोणी जवळ येत नाही**

जगात कोट्यावधी माणसे असता त्यातील ठराविक माणसांशीच आपला संबंध का यावा ? ठराविक लोकांशीच आपली ओळख का असावी ? सकृतदर्शनी काही एक कारण नसता काहींनी आपला द्वेष का करावा अगर आपणावर प्रेम का करावे ? त्यांनी आपल्यासाठी का झटावे ? अशा तऱ्हेचे अनेक प्रश्न अकल्पित घटना पाहिल्या वर उद्भवतात. सर्वांचे उत्तर एकच–नसल्या लागा बाधा काही. पूर्व संचित पूर्व जन्मीची कमाई या जन्मीचे भांडवल असतें. पूर्व जन्मीचे ऋण फेडण्यासाठी वा नुकसान भरपाई करून घेण्यासाठीं हे संबंध येत असतात. माणसांशी संबंध येतात असेच नव्हे तर ते इतर प्राण्यांशीही येतात. एखाद्या कुत्र्याचा जीव आपल्याला जीव की प्राण करील तर तोच मुका जीव दुसऱ्या जीवाचा लचका तोडायला टपून बसेल. एकाद्या ठिकाणचे मांजर व कुत्रा मेळीमेळीने वागतील तर दुसऱ्या ठिकाणचे एकमेकांचा प्राण घेण्यास उद्युक्त होतील. असे होतें कारण–लागा बाध्यावीण विशेषी । कोणी न येई आपुले पाशी । श्वान शुकर का माशी । हड हड कुणाशी करू नये ॥ अ. २–८१ ॥ सर्व पूर्व जन्मीचे लागे बाधे, ऋणानुबंध असतात. हे ओळखून आपण वागले पाहिजे. व्यवहारात संबंध येणाऱ्या माणसाशी गरीब श्रीमंत, लहान मोठा असा भेद न ठेवता आपण विनयानें व सौजन्यानें वागलें पाहिजे. कुत्र्याप्रमाणें आल्या गेल्यावर भुकत सुटू नये. लोकांना

टाकून, टोचून खोचून बोलणे म्हणजे पुढील जन्मीच्या ऋणानुबधाची पूर्व तयारी करणे होय. अहकार माणसाला असे करावयास लावतो. अहकार बाळगू नये व वसवसा करण्याची सवय माणसाने टाकून द्यावी. आपल्या घरी आल्या गेल्याशी सौजन्याने व आदराने वागावे. यात चातुर्य असावे. नाहीतर या हल्लीच्या लबाड जगात नसत्या भानगडी मागे लागावयाच्या. लुच्चे लफंगे सासर पेरीत येतील. यास्तव आल्या गेल्याच्या बाबतीत सावधानपणे वागणें जरूर असलें तरी एकदम श्वाना ऐसा वर्तू नये. कोणी सागावे कदाचित आल्या गेल्यात बाबाही फेरी मारून जायचे. यास्तव सौजन्य, आदर, विजय सदैव दाखवावा. यामुळे आपले ऋण फेडले जाते व ईश्वर सतुष्ट होतो. आपला मुलगा वेळच्या वेळा कर्जाचे हप्ते भरून दिवसे दिवस ऋण हलके करीत आहे हे पाहून कोणत्या वडिलाना समाधान वाटणार नाहीं? असा पुत्र वडिलाना लाडका झाल्यास नवल काय?

---

# तुझाचि आधार

आम्हा निर्बलांना, तुझाचि आधार
दावी दावी तुझे, रुप हें साकार ॥
तूंचि ब्रह्म आम्हा तूंहि आदिमाया
देवरुप तूं आम्हा दावियली काया
आम्हा निर्बलांना तुझाचि आधार
दावी दावी तुझे रुप हे साकार ॥१॥
शब्द गाती तुझे जे रुप साकार
ब्रह्मानंदी रंगता तूं होशी निराकार
आम्हा निर्बलांना तुझाचि आधार
दावी दावी तुझे रुप हें साकार ॥२॥
गुण वर्णनांत सारे भक्त रंगताती
त्याच्च भावना या येथें मला स्पर्शताती
आम्हा निर्बलांना तुझाचि आधार
दावी दावी तुझे रुप हें साकार ॥३॥
संकटांत साथ आम्हा देशी भगवंता
भक्त तुझ्या द्वारी तया द्वारी राही उभा
आम्हा निर्बलांना तुझाचि आधार
दावी दावी तुझे रुप हें साकार ॥४॥

—विमल देशमुख, बी. ए. बी. टी

# नामदेव-वचनावली

(अनुवादक—गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.)

: १ :

## कपटी कौं न मिले हरिनाम

कपटी किंवा धोकेबाज माणसाला हरिनामाची प्राप्ति होत नाही भगवान साधु-हृदयात असतो. कपटी मनुष्य इष्ट साधनाच्या प्राप्तीसाठीं अंतःकरण लपविण्याच्या वृत्तीची जोड करतो, नानातऱ्हेची रूपें घेतो आणि गोड गोड बोलून जगाला फसवितो. हातीं दिवा असून तो जाणूनबुजून खोल खड्ड्यांत पडतो. सोनें सोडून तो नकली वस्तूंचा सौदा करतो. अमृताला टाकून विषाचे सेवन करतो. नामदेवांचा स्वामी अंतर किंवा हृदय जाणणारा आहे. त्याचें मी रात्रंदिवस स्मरण करीत राहतो.

: २ :

## रामा हो, रामा, रामा हो रामा

प्रभू रामराया ! अहो रामराया !! अहो रामराया !!! या जगांत तुम्हीच माझे आहांत. हे रामराया ! तुम्ही निश्चित माझे आहात !! मी नामदेव तुमच्या द्वारांतील नर्तकी असून तुमचे यश गातो, गुणसंकीर्तन करतो.

: ३ :

## सूचम साचम, कूचम काचम

सच्सच्, कच्कच् म्हणजे ठक्ठक् आवाज करीत धोबी कपड्यांचा मळ काढतो (मनाचा नाही). यात तो काय कमावितो? उठता बसता एका ईश्वराचें ध्यान करावे. ग्रंथ, मंत्र आणि तंत्र याचे नितात ज्ञान प्राप्त करून घेतलें तरी रसनेच्या द्वारें ईश्वराची स्तुति करावी. मनाच्या वृत्तींना रोखण्याचा उपाय म्हणजे चढउताराचा अति कठिण पहाडी मार्ग आहे. किती मार्गांनीं ध्यानयोगाचें ग्रहण करशील? नामदेवांच्या अंतःकरणात नामस्मरण हीच एक प्रकारची संध्या आहे, ध्यानोपासना आहे. दुसरे कांहीं नाहीं. रामनाम घ्यावे आणि रामनाम द्यावे. रामनाम हीच नामदेवांची पुंजी अगर संपत्ति आहे.

## राज्यमंत्री व साईभक्त

# श्री. दातार यांचें निधन

केंद्र सरकारच्या गृहखात्याचे राज्यमंत्री श्री. बळवत नागेश दातार हे बुधवार ता. १३ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराच्या झटक्यानें एकाएकी निधन पावल्याचें लिहिण्यास अत्यंत दुःख होत आहे. त्याचे वय ६८ वर्षांचें होतें. त्याना गेल्या कांहीं दिवसापासून बरें वाटत नव्हतें. यामुळें दिल्ली येथील वेलिंग्टन नर्सिंग होममध्ये त्यांना दाखल करण्यात आलें होते. तेथेंच त्याचें प्राणोत्क्रम झाले.

श्री. बळवंतराव दातार हे साईबाबांचें परम भक्त होते. गेल्या अनेक वर्षांपासून बाबावर त्याची निष्ठा जडली होती. सवड होई तेव्हां तेव्हा शिरडीस येऊन बाबाचें दर्शन घेऊन व त्याची पूजाअर्चा करून ते जात असत. त्यांची साई-भक्ति व निष्ठा लक्षात घेऊन कांहीं वर्षांपूर्वी मुबईत जे साईभक्ताचें संमेलन फार मोठ्या प्रमाणात भरविण्यात आलें होतें त्याचें अध्यक्षस्थान त्याना देण्यांत आलें होतें व ते त्यानीं उत्तमप्रकारें शोभविलें होतें. त्याप्रसंगी त्यानीं साईबाबावरील आपली आत्यातिक निष्ठा प्रगट केली त्याच-प्रमाणें साईभक्ताना त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देऊन त्यांचें मार्गदर्शन केलें होतें. शिरडी संस्थानच्या कारभाराकडे त्यांचें लक्ष असे व वेळोवेळीं उपयुक्त सूचनाहि ते करीत असत. अलिकडेच आपल्या ग्रंथ संग्रहांतील कांहीं धर्म व तत्वज्ञान विषयक ग्रथ त्यानीं शिरडी येथील भक्ताच्या सोयीसाठीं चालू असलेल्या वाचनालयास भक्तिभावानें अर्पण केले होते.

श्री. दातार याचा जन्म ता. १३ आगष्ट १८९४ रोजीं तासगाव [सातारा] येथे झाला. शिक्षण पुणें व बडोदा येथील कॉलेजात झाले. एम्. ए. च्या परिक्षेसाठीं वेदान्त हा विषय घेऊन त्यानीं 'झाला प्राईज' मिळविलें.

नंतर १९२० साली धारवाड कॉलेजांत ते सस्कृत व इंग्लिश विषयाचे प्राध्यापक झाले. तेथेंच न थाबता त्यानीं अॅडव्होकेटची परिक्षा दिली व बेळगावांत वकिली करीत असताही तेथील लॉ कॉलेजात प्राध्यापक या नात्यानेही काम करीत होते. मुबई विद्यापीठ सीनेटचे ते सभासद होते. नतर कर्नाटक विद्यापीठ स्थापन झाल्यानतर त्या विद्यापीठाच्या सीनेटवर ते गेले. त्यानीं कॉंग्रेसमध्यें प्रवेश करून लोकजागृतीचे कार्यही केलें. १९५२ ते १९५५ पर्यंत केंद्र सरकारच्या गृहखात्यात ते उपमंत्री होते व नतर १९५५ पासून त्याच खात्यात राज्यमत्री या नात्यानें त्यांची नेमणूक झाली. १९६५ साली ज्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकींत बेळगांव विभागातर्फे कॉंग्रेसच्या तिकिटावर ते निवडून आले व पूर्वीच्या राज्यमत्री पदावरच ते शेवटपर्यंत होते.

त्याच्या निधनानें भारत सरकारचे, त्याचें कुटुंबियांचें त्याचप्रमाणें शिरडी संस्थानचेही नुकसान झालें आहे. त्याच्यासारख्या निष्ठावान भक्ताला ईश्वर सद्गति देईलच देईल.

# हास्पिटल फंडासाठीं रोखीने जमा झालेल्या रकमांचा तपशील

## ता. २३।११।६२ ते ११।२।६३ अखेरपर्यंत

| अ. न. | नाव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | श्री. के. के माणेकजी | मुंबई | १०.०० |
| २ | ,, प्रवीण शाह | ,, | १०१.०० |
| ३ | ,, एक साई भक्त | ,, | ५१.०० |
| ४ | ,, एम. बी. सी. ६७६६ | ,, | २१.०० |
| ५ | ,, गुलझनानि आगा | ,, | ५.०० |
| ६ | ,, जशवंत दलाल | ,, | १५.०० |
| ७ | ,, जयवंती शहा | ,, | ५.०० |
| ८ | ,, कुमुद देसाई | ,, | १०.०० |
| ९ | ,, एम. एल. धनवटे | हैद्राबाद | १०१.०० |
| १० | ,, ए. सी. पटेल | करोडा | ११.०० |
| ११ | ,, व्ही. एस. देसाई | नडीयाद | ५१.०० |
| १२ | ,, विठ्ठलराव माधवराव डोंगरे | बेळकाणी | १०१.०० |
| १३ | ,, डीना पटेल | मुंबई | २१.०० |
| १४ | ,, रती पटेल | कलकत्ता | ११.०० |
| १५ | श्री. एस. एन. कुर्ग | मुंबई | १००.०० |
| १६ | ,, मधुकर भट | ,, | ११.०० |
| १७ | डॉ. एस. डी. गुजराथी | शिर्डी | २५.०० |
| १८ | श्री. आर. पिलाय | मुंबई | १००.०० |
| १९ | ,, जे. पी. दवे | ,, | ११.०० |
| २० | ,, जी. अरीगापती | एलुरु | ५.०० |
| २१ | ,, रामनाथ नारायण महाजन | जळगाव | ७.०० |
| २२ | ,, वाला साडु पाटील | गोंडगाव | ५१.०० |
| २३ | ,, बालाभाई शंकरभाई | निझामाबाद | ११.०० |
| २४ | मिसेस रेशमाबेन दमानी | देवळाली | १५१.०० |
| २५ | श्री. डाह्याभाई भगवान | मुंबई | १५.०० |
| २६ | ,, डाह्याभाई दामोधर | अहमदाबाद | २०.०० |

| अ. न | नाव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| २७ | श्री. माहेबराव बाबुराव सानप, | मौवुसाडा बीड | ११·०० |
| २८ | ,, के. एम. बसय्या | औरंगाबाद | २५·०० |
| २९ | ,, सी. एम. पटेल | मुंबई | २५·०० |
| ३० | ,, एम बी. पटेल | मुंबई | ५१·०० |
| ३१ | ,, कांतीलाल भावचंद | अहमदाबाद | २५·०० |
| ३२ | ,, अशोक ताटे | मुंबई | ५०५·०० |
| ३२ | ,, के वेंकटेश्वरराव | राजमहेंद्री ए. पी. | १०·०० |
| ३४ | ,, जे डी. कुपर | मुंबई | १५०·०० |
| ३५ | ,, एम. रुस्तमजी | ,, | ११·०० |
| ३६ | ,, जे. डी. बक्षी | ,, | २१·०० |
| ३७ | ,, वाडीलाल सुरचंद | ,, | ११·०० |
| ३८ | ,, रुक्मिणीबेन जेठालाल | ,, | ३०·०० |
| ३९ | ,, मणीबेन केशवलाल | ,, | १०·०० |
| ४० | ,, मुमनलाल गिडवाल | ,, | ११·०० |
| ४१ | ,, कुंटल घडीयाली | ,, | ११ ०० |
| ४२ | ,, मिसेस शोभणा घडीयाली | ,, | २५·०० |
| ४३ | ,, गोविंद चिंतामण भिडे | डोंबिवली | ५०१·०० |
| ४४ | मिसेस उपाबाई भोजराज | मुंबई | १०१ ०० |
| ४५ | ,, रामा बी. रावल | ,, | ५·०० |
| ४६ | नामदार एन. एस. पाटील | मुंबई | ११·०० |
| ४७ | एक साईभक्त | | १०·०० |
| ४८ | श्री. आर. एस. बेटटाबेट | मुंबई | १०१·०० |
| ४९ | ,, डो. एन्. दत्त | न्यु दिल्ली | १५·०० |
| ५० | ,, प्रताप नारायणदास | मुंबई | ११·०० |
| ५१ | ,, बी. शिवप्पा | इचलकरंजी | ५·०० |
| ५२ | ,, काशीराम सोनाजी पाटील | वाशीम | २०·०० |
| ५३ | सौ. गुहकर्णा काशीराम पाटील | ,, | २०·०० |
| ५४ | श्री. आत्माराम नागेस मखली | मुंबई | ३०·०० |
| ५५ | ,, सी. आर. मेहता | ,, | ११·०० |
| ५६ | ,, भगवानदास संघवी | ,, | ११·०० |
| ५७ | ,, एस. एस. भेंडे | ,, | १०·०० |

| अ. न. | नाव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ५८ | सौ. बदामी | मुंबई | ११.०० |
| ५९ | एस. अरुण | ,, | ५.०० |
| ६० | सौ. तुलसीबाई | मुंबई | २५४०.५३ |
| ६१ | ,, इंदु जे. पटेल | मुंबई | ११.२५ |
| ६२ | ,, मधुभाई आर. पटेल | आनंद | २५.०० |
| ६३ | ,, जेठमल रतनसी | मुंबई | ११.०० |
| ६४ | मिसेस फडणीस | लक्ष्मीवाडी | ५.०० |
| ६५ | मि. ॲड. मिसेस गोलवाल होमी | मुंबई | ११.०० |
| ६६ | मिसेस शिवाकेन रुस्तुमजी कॉन्ट्रॅक्टर | ,, | ११.०० |
| ६७ | ,, एक साईभक्त | ,, | ५. ५ |
| ६८ | श्री. जे. एन. मोदी | मुंबई | ११.०० |
| ६९ | ,, वेरुमला केशवचद | ,, | १०.०० |
| ७० | ,, एस. एम. दाडे | अलाहाबाद | ५.०० |
| ७१ | ,, एस. ए. एल. नारायणराव | मुंबई | ५.०० |
| ७२ | ,, के. टी. मदनानी | ,, | १५१.०० |
| ७३ | श्री. एल. सी. डी. नानजी | ,, | ५०१.०० |
| ७४ | ,, के. एस. सुकान्ना | ,, | २०.०० |
| ७५ | ,, चेदुभाई डाह्याभाई देसाई | नवसारी | ५१.०० |
| ७६ | मिसेस वेणुताई पुरोहित | भोपाळ | ११.०० |
| ७७ | ,, एस. एस. कुरजी | निपाणी | ५.०० |
| ७८ | ,, रामचद्र पढरीनाथ डकारे | पाढरकवडा | १०१.०० |
| ७९ | सौ. हिराबाई आनंदराव सोलव | अमरावती | १२५.०० |
| ८० | श्री. जे. एन्. देसाई | बरोडा | ३०.०० |
| ८१ | ,, माणेकशा सोराबजी बोडे | मुंबई | २१.०० |
| ८२ | ,, एन्. सी. मेहता | मुंबई | २५१.०० |
| ८३ | ,, ए. बी. शाह | ,, | ११.०० |
| ८४ | ,, हिराबाई कोठारी | जबलपूर | ७ ०० |
| ८५ | सौ. ज्योती वसतराव कानडे | मुंबई | २१.०० |
| ८६ | श्री. चंद्रकात जी. शाह | ,, | ५१.०० |
| ८७ | ,, टी. हनमंतराव | सिकंदराबाद | ५.०० |
| ८८ | ,, एस. बालरसा | | ५.०० |

| अ. न. | नाव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ८९ | श्री. एम. मुथय्या | सिकंद्राबाद | ५.०० |
| ९० | ,, हीराभाई एन. पटेल | तिनबेरथा | १३६.५० |
| ९१ | ,, छोटाभाई एन. पटेल | ,, | ५.०० |
| ९२ | ,, काशीकेन रणछोडभाई | नैरोबी | ९.९५ |
| ९३ | मेसर्स नानाभाई | मुंबई | ११.०० |
| ९४ | ,, इराच पनंजा | ,, | ५.०० |
| ९५ | श्री. एस. पी. माड्डु | विशाखापटणम | १२.०० |
| ९६ | मिसेस माड्डु | ,, | ५.०० |
| ९७ | ,, धनत्री | मुंबई | ५.०० |
| ९८ | ,, भिनु करकरीया | ,, | ५.०० |
| ९९ | श्री. जे. रेशमवाला | धनबाद बिहार | ११.०० |
| १०० | ,, एम. जी. चक्रदेव | मुंबई | २५.०० |
| १०१ | ,, कमल नाडकर्णी | ,, | ५.०० |
| १०२ | ,, एस. पी. शिंदे | ,, | १२५.३१ |
| १०३ | ,, के. एन. माणीक | जरीया धनकार | ४०१.०० |
| १०४ | ,, बी. के. श्रॉफ | मुंबई | १०१.०० |
| १०५ | ,, ए. के. मोहन | ,, | १५.०० |
| १०६ | ,, सी. एम्. शाह | ,, | ५०१.०० |
| १०७ | मिसेस आर. ए. मेहता | लावाडल | १३.०० |
| १०८ | श्री. एस. एल. अत्रे | राहुरी | २१.०० |
| १०९ | ,, दत्तात्रय बंडोबा दगडे | भणग जळगाव | १०१.०० |
| ११० | ,, बी. बी. शाह | मुंबई | ५१.०० |
| १११ | मिसेस चव्हाण | ,, | ५.०० |
| ११२ | ,, गोडसे | ,, | ५.०० |
| ११३ | श्री. मामा | ,, | १३.०० |
| ११४ | डॉ. आमोडकर | ,, | २२.०० |
| ११५ | मि. शशीकांतसेठ | कलकत्ता | १०१.०० |
| ११६ | ,, दिनेशकांत | मुंबई | ११.०० |
| ११७ | ,, सी. व्ही. मवेकर | ,, | २५.०० |
| ११८ | श्री. शंकरराव केशव मोरे | मुंबई | ५१.०० |
| ११९ | कॅरेशा वॉच कंपनी | ,, | १२५.०० |

| अ. नं. | नाव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १२० | सुदराबाइ टी. शहाणी | मुंबई | ५१.०० |
| १२१ | कुमकुमबेन ॲन्ड पी. वर्क्स | ,, | ११.०० |
| १२२ | श्री. एम्. एस्. मयेकर | ,, | ७.७५ |
| १२३ | ,, किसन नरसय्या | पाडळदा धुळे | १००.०० |
| १२४ | ,, सुशीला बी. ठाकुर | मुबई | ५.०० |
| १२५ | श्री. व्ही. वी. माधवन | ,, | ११.०० |
| १२६ | ,, अशोक ताटे | ,, | २०००.०० |
| १२७ | एम्. व्ही. आचार्य | पुणे | ५.५० |
| १२८ | मिसेस पुरीबेन काताभाई | मुबई | १०१.०० |
| १२९ | अमर रेस्ट हाऊस | वडाळा मुबई | ३०.०० |
| १३० | श्री. उपेंद्र पेपर कार्पोरेशन | ,, | ११.०० |
| १३१ | ,, डी. डी. गुलाडी | ,, | ७५.०० |
| १३२ | ,, इदीरा संघवी | ,, | ६५.०० |
| १३३ | ,, के. जी. नरीमान | ,, | ५०.०० |
| १३४ | मिस आर. भाईराव | ,, | २०.०० |
| १३५ | श्री. मजु गुणांनी | ,, | ११.०० |
| १३६ | भाई ब्रदर्स | ,, | ११.०० |
| १३७ | श्री. ए. वी. देव | ,, | ५०१.०० |
| १३८ | ,, लावजी नरसी | ,, | २११.०० |
| १३९ | ,, बी. एन. पारडीवाला | ,, | २५.०० |
| १४० | ,, आत्माराम मुकुंद कवळी | वसई | १५०.०० |
| १४१ | ,, दशरथ दौलत पाटील | मंगरूळ | २५.०० |
| १४२ | ,, एक साई भक्त | ,, | ५.०० |
| १४३ | ,, डाली मिस्तरी | मुबई | ११.०० |
| १४४ | श्री. एस्. एस्. अय्यर | मुंबई | ५१.०० |
| १४५ | ,, एच्. बी. करबीनाथ | ,, | ११.०० |
| १४६ | ,, मुरलीधर दरयानानी | ,, | ५१.०० |
| १४७ | पेनबाई फुलनसा सिटवा | ,, | २०१.०० |
| १४८ | मेसबाई मेफन जांगोस | ,, | १०१.०० |
| १४९ | श्री. के. आर. कुमार | देवळाली | ३०.०० |
| १५० | ,, टी. बी. दर्मानिया | मुंबई | २५.०० |
| १५१ | ,, नानाभाई जिवन | सुपरपारडी नवसारी | २५.०० |

# मनिऑर्डरीनें आलेल्या देणग्या

( ता. ६–१२–६२ ते ११–२–६३ अखेर )

| अ. नं. | नाव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | श्री. जी. एस. गावकर | फोर्ट मुबई नं. १ | ५·०० |
| २ | ,, एस. व्ही पारेख | मुबई न. ४ | ५०·०० |
| ३ | ,, लॉरेंझा वॉच कपनी | मद्रास नं. १ | २५·०० |
| ४ | ,, ,, | कानपूर | २५·०० |
| ५ | ,, बी. डी. पेढूरकर, भिलाई जि. दुग एम्. पी. | | ११·०० |
| ६ | ,, जी. टी. पिरागोऊडा | उनकल | २५·०० |
| ७ | ,, सिना मगा कोळी, मोरा-पेटा-उरण-जि. कुलाबा | | २५·०० |
| ८ | ,, भास्कर खुशाल येवले | जळगांव | ५·०० |
| ९ | सौ. निर्मला दिनकर काळेकर | मु. नं. २९ | २५·०० |
| १० | ,, पी. आर. प्रधान | रायपूर | १००·०० |
| ११ | श्री. मोहनलाल व्यास | वणी | ५१·०० |
| १२ | सौ. सुशिलाबाई तुकाराम पाटील | पुणें न. ४ | ५०·०० |
| १३ | श्री. सी. एन्. साठये | धार म. प्र. | ५·०० |
| १४ | ,, सदाशिव प्रल्हाद कुळकर्णी | वानखेडे | ५·०० |
| १५ | ,, लारेंझा वॉच कंपनी | कानपूर | २५·०० |
| १६ | ,, पी. एस. जावकर | मुंबई | ५·०० |
| १७ | ,, जी. जी. चव्हाण | जयपूर | १०·०० |
| १८ | ,, लारेंझा वॉच कंपनी | मद्रास न. १ | २५·०० |
| १९ | ,, ,, | कलकत्ता | ५०·०० |
| २० | ,, एस. एस. मलीनाथ | बॅंगलोर | ५५·०० |
| २१ | ,, एच. यु. गोविंदराज | मुंबई | १२·०० |
| २२ | ,, लारेंझो वॉच कंपनी | कानपूर | २५·०० |
| २३ | सौ. अहिल्या द. ढोबळे | मुंबई | ११·०० |
| २४ | ,, लारेंझा वॉच कंपनी | मद्रास | २५·०० |

## मुंबई ऑफिसकडे हॉस्पिटल फंड जमा

ता. १-११-६२ ते १४-२-६३

| अ. न. | नाव | पत्ता | रकम रु. |
|---|---|---|---|
| १ | श्री. बी. के. पाटील | डीग्रस | २००·०० |
| २ | ,, बी. ए. रजन | मुबई | १०·०० |
| ३ | मे. पटेल अँ. कं. | मुंबई | ५१·०० |
| ४ | श्री. एफ. जे. आठ्या | सुरत | ११·०० |
| ५ | ,, आर. बी. पटेल | सैलीसबेरी | २६·५० |
| ६ | ,, बी. बी. पटेल | टांगा. | १३·२५ |
| ७ | सौ. श. अ. कुर्लेकर | मुंबई | ११·०० |
| ८ | श्री. व्ही. एन. बोरकर | ,, | ११·०० |
| ९ | ,, एस. पी. कामथ | सिकदराबाद | १२·०० |
| १० | ,, बी. ए. चमना | तिरुपथी | ५·०० |
| ११ | कु. चपा आफळे | दिल्ली | १०१·०० |
| १२ | श्री. आय. बी. परेख | युगांडा | २६·५० |
| १३ | ,, एच. जे. महमद | देवळाली | १००·०० |
| १४ | साईभक्त | मुंबई | १०·०० |
| १५ | श्री. श्री. सुर्यप्रकाश | यादगिरी | ३००·०० |
| १६ | ,, म. छ. कापडीया | मुंबई | १५१·०० |
| १७ | ,, अ. एम. मलेरी | टोगा | २०·०० |
| १८ | ,, आर कृष्णनन | कुबाईट | ६·६३ |
| १९ | ,, मेहरुपी सिधवा | मुंबई | ४६·०० |
| २० | ,, पा. ब. पाटील | ,, | १५७·५० |
| २१ | ,, एम्. हबीबभाई | कंपाला | ७·२९ |
| २२ | ,, बी. जे. देसाई | दारेसलाम | ६·६३ |
| २३ | ,, बी. जे. देसाई | ,, | ६·६३ |
| २४ | ,, डी. आर. पटेल | ऐनटेबे | १६·५६ |
| २५ | ,, जे. डी. मोटाफ्राम | मुंबई | ६०·०० |
| २६ | ,, प्र. के. शिदे | शहाबाद | २५१·०० |
| २७ | ,, एन. एम. मेहता | युगवाड | ६६·२५ |
| २८ | साई भक्त | एडन | ३३·८० |

| अ. नं. | नाव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| २९ | श्री. व्ही. एन्. शामराव | मद्रास | १५·२८ |
| ३० | श्री. म. य. देसाई | मुंबई | ६·०० |
| ३१ | सौ. लीला. म. देसाई | ,, | ५·०० |
| ३२ | श्रीमती सुशीला आपटे | ,, | २०·०० |
| ३३ | श्री. जी. माणेकशा | ,, | १५·०० |
| ३४ | डॉ. सी. जी. पटेल | कपाला | १७६·०० |
| ३५ | श्री. के. जी. पटेल | ,, | २५·०० |
| ३६ | ,, व्ही. के. श्रॉफ | मुंबई | २५०·०० |
| ३७ | ,, जी. हीरा | जोहन्सबर्ग | २६·५० |
| ३८ | ,, जी. ए. नारकर | मुंबई | १०१·०० |
| ३९ | साईभक्त | ,, | ५·०० |
| ४० | श्री. आर. आर. पटेल | सॅलीसबरी | ६६·२५ |
| ४१ | ,, एल. पी. शहा | नैरोबी | ६६·२५ |
| ४२ | ,, डी. सी. पटेल | इनडोला | १३·२५ |
| ४३ | ,, म. य. देसाई | मुंबई | ५·०० |
| ४४ | ,, टी. आर. कवळी | ,, | १६·०० |
| ४५ | ,, म. गो. जोशी | ,, | ४८·०० |
| ४६ | ,, बी. एम. रामकृष्ण | मद्रास | ४०·०० |
| ४७ | ,, डी. आर. जोशी | मुंबई | ५०·०० |
| ४८ | ,, जी. के. चेंबुरकर | मुंबई (श्रीसाईधाम) | ८२·२५ |
| ४९ | ,, पी. एस. मुथाना | विरज | ५·०० |
| ५० | ,, एन. व्ही. दवे | अहमदाबाद | २५·०० |
| ५१ | ,, सी. एन्. पटेल | | ४०·०० |
| ५२ | ,, एम. के. पटेल | ब्रोकन हील | २६·५० |
| ५३ | ,, एस. सी. जुगाजीनी | बागलकोट | १५·०० |
| ५४ | ,, कुसुम मास्टर | मुंबई | १२५·०० |
| ५५ | सौ. शारद रमाणी | त्रिवेंद्रम | १२·५० |
| ५६ | श्री. जी. आर. भट | मुंबई | १०·२५ |
| ५७ | ,, एन. एन. सुर्ती | बेलगाम | १०·०० |
| ५८ | ,, एस. बी. गोहील | ममबासा | २६·५० |
| ५९ | ,, व्ही. एच. पटेल | मोनझे | १३·२५ |

| अ. न. | नाव | पत्ता | रक्कम रु. |
| --- | --- | --- | --- |
| ६० | श्री. एम. एम. देसाई | अहमदाबाद | १८०.०० |
| ६१ | ,, एस. एम. बोरकर | धारवाड | १०१.०० |
| ६२ | श्रीमति अन्नपूर्णा सिताराम | शिलाग | १०.०० |
| ६३ | श्री. एस. ए. नायडू | दिल्ली | ५.०० |
| ६४ | ,, एम. आर. गोपाळ | मुंबई | २५.०० |
| ६५ | ,, एम. डी. नाडकर्णी | ,, | ५०.०० |
| ६६ | सौ. उर्मिला नी. जुकर | अंधेरी | ५.०० |
| ६७ | श्री. वि. ना. राज | मुंबई | २५.०० |
| ६८ | ,, पेरीन पी. सिधवा | ,, | १५.०० |
| ६९ | ,, मेहरू पी. सिधवा | ,, | १५.०० |
| ७० | श्री. व श्रीमति गोळवणकर | ,, | ११.०० |
| ७१ | ,, जी. एस जोशी | ,, | ५.०० |
| ७२ | ,, एन. के. सुवर्ण | ,, | ५.०० |
| ७३ | ,, आर. एन. कवळी | ,, | ५.०० |
| ७४ | ,, व्यं. एल. कोडल | ,, | १२५.०० |
| ७५ | ,, केशवजी ( कोहिनूर स्टॉल ) | ,, | ५.२५ |
| ७६ | सौ. विमल म. डागी | ,, | १०.०० |
| ७७ | श्री. एम. जी. भट | ,, | १०.०० |
| ७८ | ,, जे. आर. मुधोळकर | दिल्ली | १०१.०० |
| ७९ | डॉ. प्या. अम्हीन्हा | हैद्राबाद | ५.०० |
| ८० | श्री. एन्. व्ही. परमार | लुकासा | २६.५० |
| ८१ | ,, आर. व्ही. पटेल | पनामा | २०.०० |
| ८२ | मेजर बी. एस. त्यागी | ५० ए. पी. डी. | ५१.०० |
| ८३ | डॉ. एन्. डी. दाजी | मुंबई | ६.०० |
| ८४ | श्री. एच. जी. जोशी | युगांडा | ३९.७५ |
| ८५ | ,, कृ. ख. पाटील | डग्रिस | १२५.०० |
| ८६ | मेजर पी. ए. नायडू | दिल्ली | ५.०० |
| ८७ | श्री. द. ग. वैद्य | मुंबई | ५.०० |
| ८८ | सौ. नलिनी न. कर्णेकर | ,, | ५.०० |
| ८९ | श्री. वाय. जी. माने | चंबक प्रॉ. | १५१.०० |
| ९० | ,, व्ही. एम. पिल्ले | काबुल | ५०.०० |

| अ. नं. | नाव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ९१ | श्री. आर. पी. मिस्त्री | एडन | १०.०० |
| ९२ | श्री. जी. ए. दलाल | अहमदाबाद | १००.०० |
| ९३ | ,, एम. एम. भट | नैरोबी | १३.७१ |
| ९४ | ,, जी. आर. भट | मुंबई | १०.२५ |
| ९५ | ,, बी. बी. देसाई | इनडोला | ६६.२५ |
| ९६ | ,, डी. एन. खेरडेकर | दिल्ली | १०१.०० |
| ९७ | ,, जी. एस. करडे | गोरेगाव | १०१.०० |
| ९८ | सौ. वाय. व्ही. सुमती | ककीनाडा | १०.०० |
| ९९ | श्री. के. व्ही. राघवाराव | नरसिंह पेटा | ७ डॉलर्स |
| १०० | श्री. बी. बी. दवे | वि. पार्ले | १०१.०० |
| १०१ | ,, व्ही. यु. कोद्दु | नागपूर | ५.०० |
| १०२ | मे. पै ऑटोमोबाईल कं. | सिकंदराबाद | ११.०० |
| १०३ | मिस. के. पी. गिडवानी | मुंबई | १५.०० |
| १०४ | मेजर नायडू | दिल्ली | ५.०० |
| १०५ | श्री. आर. एच. दवे | मुंबई | २५.०० |
| १०६ | ,, बा. कृ पाटील | डीग्रस | १२५.०० |



लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# श्रीसाईनाथ हॉस्पिटल

## भक्तांना आवाहन

सच्चिदानंद जगद्गुरु श्रीसाईनाथ महाराजांची श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी ही धार्मिक संस्था प्रामुख्येंकरून भक्तांच्या दानाधर्मावरच चालत आहे. बाबांच्या हजारो भक्तांचें त्यांच्या आशिर्वादानें कल्याण झाले असून ते त्यांचा विश्वबंधुत्वाचा आदेश सर्वत्र पसरवीत आहेत, कीं ज्यामुळें भारतवासीयच नव्हे तर सर्व जगातल्या भक्तांचें कल्याण झाले आहे.

हल्लीच्या प्रगत युगात मानवाच्या गरजा वाढल्या आहेत आणि कदान्न व दूषित वातावरण यामुळें रोगराई वाढून औषधी उपाय योजना वेळींच मिळण्याची आवश्यकता फार वाढली आहे. संस्थानच्या घटनेंत भक्तांना विनामूल्य वैद्यकीय मदत पुरविणें हें एक उद्दिष्ट असून आरोग्यगृह 'सॅनेटोरीयम' बांधणेंही त्यात अंतर्भूत आहे.

या हेतूस अनुसरून शिर्डी येथें परिपूर्ण अद्यावत् इस्पीतळ ज्यांत प्रसूतीसाठी व सार्वत्रिक रोग्यांसाठीं मिळून २४ खाटांची तर्तूद आहे, असे बांधण्याची योजना आंखली आहे. त्यांत शस्त्रक्रियेचें मंदिर, प्रसूतीगृह, तसेंच आतील व बाहेरील रोग्यांना औषधें देण्याची योजना वगैरेचा अंतर्भाव केला जाणार आहे. या इमारतीस सव्वा दोन लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे व कामास सुरवात झाली असून तें अर्धेअधिक पूर्ण होत आलें आहे.

संस्थान सर्वस्वी भक्तांच्या मदत व देणग्यावर अवलंबून असल्यामुळे भक्ताना आमची नम्र विनंती आहे कीं, त्यांनीं या योजनेचा मानवतेच्या दृष्टीने विचार करून व त्यांत आर्त व गरजू गरिबांची, ज्यांना पैशाचे अभावीं अशा साधनाची उणिव जाणवते अशांची, होणारी तर्तूद जाणून सढळ हातानें मदत पाठवावी. शिरडी हे मोठ्या शहरापासून व रेल्वेपासून दूर असें खेडेगांव असल्यानें तेथील व आसपासच्या जनतेस वैद्यकीय मदतीची फार गरज आहे. आपले सहाय्याने बाबा संतुष्ट होऊन आपलेंच कल्याण करतील. आणि आपलें भक्तीला फळ येऊन आपल्या देशात विश्वबंधुत्वाचें भावनेस भर येईल.

आपलेवर व आपले कुटुंबांतील सर्वांवर व मित्रमंडळीवर श्री बाबांची कृपादृष्टी असो !

आपला साईसेवक,
**श्रीपाद बाळकृष्ण दर्प**
कोर्ट रीसीव्हर श्रीसाईबाबा सं. शिर्डी.

# पोंच आणि अभिप्राय

**श्रीमद्भगद्गीता :**—कुडाळी महारठी भगवतगीता, अध्याय १ ते ३. अनुवादक संशोधक—अ. ब. वालावलकर, प्रकाशक—कोकण मराठी डायलेक्टस रिसर्च इन्स्टिटयूट, २५ के. बी. निवास, मुंबई ४ किंमत ५० नये पैसे. कुडाळी—कोकणी काव्यांत भगवद्गीतेचा अनुवाद करणारे श्री. वालावलकर हे त्या भाषेचा अभ्यास केलेले व त्या भाषेचे अभिमानी संशोधक आहेत. आणि त्यामुळेंच आजच्या काळांत 'अव्यापारेषु व्यापार' वाटणारा हा खटाटोप त्यानी केलेला आहे. हौसेला का कुठें मोल असते ? त्याचा हा प्रयत्न खरोखर मोठा कौतुकास्पद आहे असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. आमचे एक मित्र श्री. पांडुरंग शिरोडकर पोर्तुगीजांच्या कैदेंत पधरा वर्षें घालवून नुकतेच सुटून आले. त्यानी तुरुगात असतां लो. टिळकांच्या गीता रहस्य या ग्रथाचें पोर्तुगीज भाषेंत भाषांतर केलें. त्या ग्रंथाची व त्या भाषेची आवड म्हणून केवळ मनोरंजनार्थ त्यानीं हा खटाटोप केला. तो पोर्तुगीज भाषेंतील ग्रंथ प्रसिद्ध करणारा हरीचा लाल कोण भेटेल ? हा विचार त्याच्या मनाला शिवला नाहीं. हाहि तशातलाच प्रकार आहे; परंतु श्री. वालावलकर हे भाग्यवान् दिसतात. त्यांच्या या हौशी प्रयत्नाचे प्रकाशन करणारी व त्या भाषेचा अभिमान बाळगणारी कोकण मराठी डा. रि. इन्स्टिटयूट ही सस्था त्याना भेटली !

ह्या कुडाळी कोकणी भाषेचा नमुना पहा:—अर्जुन्यू म्हणालो;

कृष्णा सोज्यन मेळो हो देखिलो म्या युयुत्सुंचो। माझीं ही गळलीं गात्रां तोंडा पडलें कोरड। कापरी भरली देहा फुले काटीं लर्वीलवी ॥ गाडीव हातिंचा घळता वाटता आग हुलापता। उभ्या रावांक नजा जालां मन खरा भरामला ॥

कोंकणी भाषा ऐकण्याचा ज्याना सराव आहे त्याना या श्लोकांत गोडी वाटल्याशिवाय रहाणार नाही. काव्यमय अनुवाद करीत असता मूळ शब्दार्थाला बाध येणार नाहीं याबद्दल जास्तींत जास्त खबरदारी घेण्यात श्री. वालावलकर यांनीं कसूर केलेली नाहीं आणि हीच तर महत्वाची गोष्ट आहे.

अशा रीतीनें गीतेच्या अठराही अध्यायाचा अनुवाद त्यांच्याकरून परिपूर्ण होऊन तो प्रकाशात येईल अशी आशा आहे.

**राष्ट्रवाणी**—संपादक **रमाणिक सरैया,** आर्य समाज बिल्डींग, काकडवाडी, मुंबई ४, राष्ट्रवाणी ( गुजराथी ) आतां चौदाव्या वर्षांत पदार्पण करीत आहे याबद्दल धन्यवाद. सतसेवेला वाहिलेले सात्विक स्वरुपाचे साप्ताहिक सध्यांच्या काळांत

चालविणे म्हणजे ती तारेवरील सर्कस आहे. किती त्रास, किती दगदग व आर्थिक चिंता वहावी लागत असते हे जाव त्यांच्या जन्मा तेव्हा कळे. श्री. रमणीक भरैया हे साईबाबाचे एकनिष्ठ भक्त आहेत. त्यांचें हें कार्य त्यांनी सेवाभावाने चालविलें आहे व तेच त्याना जरूर ते सामर्थ्य देत आहेत चौदाव्या वर्षाचा पहिला अंक नववार्षिक अंक म्हणून प्रसिद्ध करण्यात आला आहे. कव्हरवर साईबाबाचा तीन रंगी फोटो व अंतरंगही अनेक फोटोंनी सजविण्यात आले आहे. या अंकात अनेक थोरामोठ्यांचे शुभ संदेश देण्यात आले आहेत. त्यात मुंबईचे महापौर श्री. नगीनदास शहा, संत कमूबाबा, स्वामी श्रीसाईशरणानंद वगैरेंचा उल्लेख करता येईल. भारतभूमी ही संतांची भूमी आहे, श्री उपासनी महाराजांचा समागम, शिरडी येथील ध्वजवंदन, संत गंगा भगत श्रीसाई बाबा, स्वामी विवेकानंद वगैरे वाचनीय लेखांनी या अंकाचें अंतरंग उत्तम प्रकारे सजविण्यात आले आहे.

श्री. भरैया यांच्या या सुंदर उपक्रमाबद्दल त्यांचे आम्ही अभिनंदन करतो.



भगवंता! माणूस माणसाप्रमाणें कधीं वागू लागेल, माणसांत बंधुभाव कधीं जागा होईल त्याची मी वाट पहात आहे. आम्हीं सर्व भगवंताची लेकरें आहोत. आणि म्हणून आम्हीं एकमेकांशी बंधुभावानें वागलें पाहिजे.

× × ×

हे असें का आणि ते तसें का? याचा विचार आम्हां करण्याची जरूरी नाहीं. आम्हीं आमचें कर्तव्यपालन करण्यासाठीं झटावयाचें व कर्तव्यपालन करता करता या जगाचा निरोप घ्यावयाचा. कधींही दुःखी-कष्टी होऊं नका. नेहमी आनंदी रहा. या जगांत कर्तबगारी गाजवून दाखविण्यासाठी भगवंतानें मला पाठविलें आहे व मी कर्तबगारी गाजवून दाखविणार, त्यासाठींच माझा जन्म आहे अशी बळकट श्रद्धा प्रत्येकानें बाळगली पाहिजे.

× × ×

स्वतः सद्गुणी व्हावयाचें, सर्वांकडून भला रे भला म्हणवून घ्यावयाचें व सत्कृत्यें करण्यात जीवन घालवावयाचें—हेच सर्व धर्मांचें सार सर्वस्व आहे.

**—स्वामी विवेकानंद**

# संधी साधली पाहिजे

—संत तिरुवल्लुवार

कोणत्याही प्रकारचा लढा असो. त्याला तोंड देताना योग्यवेळ पाहिली पाहिजे. ती येईपर्यंत वाट पहात राहिलें पाहिजे. ती वेळ साधण्याचे फार महत्त्व आहे. योग्य वेळी टोला हाणला असता तुम्हाला जय मिळालाच पाहिजे.

कावळा पहा ना. तुलनेच्या दृष्टीने पहाता तो यकश्चित् प्राणी आहे. त्याच्यापेक्षा घुबड शक्तिसंपन्न आहे; परंतु त्याला पकडीत आणण्यासाठी कावळा त्याच्यावर दिवसा हल्ला करील. रात्रीच्यावेळी त्याच्या वाटयास जाणार नाही.

योग्य स्थानाची निवड करणे ही गोष्टही तितकीच महत्त्वाची आहे.

होय; तत्पूर्वी आपली तयारी मात्र असली पाहिजे व विजयाच्या दृष्टीने सर्व प्रयत्न पूर्ण झालेले असले पाहिजेत.

काळवेळ, प्रयत्न व स्थळ याची योग्य निवड करण्यात आली असता या जगात कोणतीही गोष्ट अशक्य नाही. या तिन्ही गोष्टींची योग्य सांगड मात्र घालता आली पाहिजे.

आरंभ काळात अपजय पत्करावा लागला तरी योग्य वेळेची वाट पाहून सत्ताधारी जरूर तें करण्यासाठी पाऊल पुढें टाकीत असतो

लढवय्या बैल एकदम हल्ला न करता थोडा थांबेल, संधी पाहिल मग तुमच्यावर हल्ला चढवील.

शत्रूनें विश्वासघात केला म्हणून शहाणा सत्ताधारी रागाच्या भरात एकदम घुसून जाण्याचा प्रयत्न करणार नाहीं. राग करून काय साधणार आहे? तो राग आपल्या अंतःकरणांत दाबून ठेवील व विजयासाठी तयारीला लागेल, व तयारी पूर्ण झाल्यावर जें करायचे तें करील.

शत्रूच्या नाशाची वेळ यावी लागते. ती आल्याशिवाय रहात नाही. ती येईपर्यंत शहाणा सत्ताधारी शांत चित्तानें योग्य संधीची वाट पहात असतो; परंतु संधी प्राप्त झाली असतां मात्र तुम्ही गबाळेपणानें वागून चालणार नाही. तुम्ही सर्व प्रयत्नांची शिकस्त करून मग जबरदस्त टोला हाणलाच पाहिजे. अशक्य तें शक्य करून दाखविण्याचा हा मार्ग आहे.




## शिर्डीवृत्त फेब्रुवारी १९६३

या महिन्यांत मागील महिन्याप्रमाणें बाहेरगांवचें भक्ताची गर्दी श्रींचें दर्शनास बरीच होती. कांहीं कलाकारानी श्रींचें पुढें हजेरी दिली; ती खालील प्रमाणें :—

**कीर्तन** :—श्री. सौ. सरस्वतीबाई गणेश आपटे, मारुती गल्ली, बेळगाव. श्री. ह. भ. प. गोपाळ गोविंद खाडेकर, बुधवार पेठ पुणें, घ. नं. ६०३. सं. गवई विठ्ठलराव मराठे यांचीं दोन कीर्तनें एकादशीस नेहमीप्रमाणें झाली.

**गायन**:—श्री. गंगाधर शंकरप्पा हड मुंबई. श्री डॉ एस. बी. भट कसटापेठ पुणें. श्री. एम्. कें. पद्मनाथम् श्रीसाईबाबामिल मद्रास. श्री. श्रीपादराव भिमराव जमखडी (श्रीसाईसमाज हुबळे) श्री. आनंदीबाई वागळे मुंबई. श्री. शंकरराव देशपाडे कन्हाडकर संगीत विशारद नौपाडा ठाणे. श्री. सुर्यकांत मोहिले मुंबई. श्री. नरहरी दिनानाथ दारोटकर नाशिक. श्री. गोपाळ पुरण बावरा चन्नीपेठ, जळगाव पु. खा.

**नृत्य**:—कु. आशा रामकृष्ण काळे नागपेठ ६१ पुणें २.

**नकला**:—श्री. प्रल्हाद हरी लव्हाटे बोरिवली मुंबई. श्री. शेवंतीलाल जीवनलाल शहा मुंबई.

**तबला वादन**:—नारायणराव इंदोरकर दादर मुंबई., श्री. लक्ष्मणराव काळे नानापेठ, ३१६ पुणें.

**मोठ्यांच्या भेटी**:—नामदार कन्नमवार मुख्य प्रधान (महाराष्ट्र राज्य) श्रीचे दर्शन पूजा वगैरे करून हार घातला समागमे सौ. कन्नमवार याही होत्या.

**स्वराज्यदिन ता. २६ जानेवारी**—श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी तर्फे मे. रिसीव्हर साहेब यांचे हस्ते श्रीचे कळसावर (ध्वजवंदन) प्रार्थना सर्व संस्थान नोकर सेवेकरी गावातील प्रतिष्ठित नागरिक या सोहळ्यास हजर होते.

शिर्डी येथील हवा पाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.

---

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) ,, | (Kannad) | N S Anantha Raum | ३-०० |
| (६) **Glimpes of Indian Spirituality**- | | by Pradhan | १-०० |
| (७) **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगाम्करकृत | २-०० |
| (९) ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. घोड | २-०० |
| (११) साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) सगुणोपासना | (मराठी) | श्री भीष्म | ००-२५ |
| (१३) ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नावें) | | ००-०६ |
| (१७) कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) **Spiritual Symphony** | | by R S Harshid Mehta | २-५० |
| (२१) **Side lights on Sai Baba** | (Eng) | Calcutta | ००-७५ |
| (२२) **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (२३) स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | | |
|---|---|---|---|
| (1) Baba sitting on Stone | 15" × 20" | Thick | **1-00** |
| (2) ,, ,, ,, | 9½" × 13½" | medium | **00-37** |
| (3) ,, ,, in Dwarkamai | 9½" × 13½" | medium | **00-50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* ( मागवा ) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P O Shirdi. Dst Ahmednagar
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr Ambedkar Road, Dadar, Bombay 14

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.



☆

संगीताची मोहिनी
माणसाला मंत्रमुग्ध करते,
त्याचप्रमाणें कुठल्याहि
हृदयंगम चित्राची मुद्रणकृति
वाचकाला नयनमुग्ध करते!

☆

आणि म्हणूनच
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनी खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रे, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ x ८, १० x १४, १४ x २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
साईनिकतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४
संपादक व प्रकाशक: श्रीपाद बाळकृष्ण दर्पे, 'साइ निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, फ्लॅट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.